सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | गुरुवार, दि. १५ जानेवारी २०२६ | वर्ष - ३२ | अंक २७९ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


# महानगरपालिका निवडणुकीत 'पाडू'! : निवडणूक आयोग

## तांत्रिक अडचण आल्यास 'पाडू' या यंत्राचा वापर होणार

**मुंबई :** राज्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेली निवडणुकीची रणधुमाळी अखेर थांबली आहे. आज १५ जानेवारी रोजी राज्यात महानगरपालिका निवडणुकीसाठी मतदान होणार आहे. मतदानाला अवघे काही तास शिल्लक असताना निवडणूक आयोगाने मोठा निर्णय घेतला आहे. आयोगाने ईव्हीएम मशीनसोबत अचानक एक नवीन मशीन 'पाडू' आणली आहे. त्यामुळे राज्यात खळबळ माजली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेडच्या (बेल) मतदान यंत्राचा वापर मतमोजणीसाठी केला जातो. मात्र, या मशीनच्या माध्यमातून मतदानाची मोजणी करताना काही तांत्रिक अडचण आल्यास 'पाडू' या यंत्राचा वापर होणार आहे. पाडू या तंत्रद्वारे निकाल बघण्याची सुविधा उपलब्ध आहे. मात्र, पाडूचा वापर सरसकट केला जाणार नाही. तांत्रिक अडचणीच्या प्रसंगी अत्यंत अपवादात्मकरीत्या त्याचा




वापर केला जाईल, असे राज्य निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे.

भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेडची मतदान यंत्रे केवळ बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणुकांसाठीच वापरली जात आहेत. ही यंत्रे भारत निवडणूक आयोगाची असून ती 'एम३ए' या प्रकाराची आहेत. त्यात झालेल्या मतदानाची मतमोजणी कंट्रोल युनिटला बॅलेट युनिट जोडून करावी. फक्त तांत्रिक अडचण आली तरच अत्यंत अपवादात्मकरीत्या पाडूचा वापर करावा, असे राज्य निवडणूक आयोगाचे आदेश आहेत.

### १४० ठिकाणी वापरले जाणार 'पाडू'

बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणुकांसाठी १४० 'पाडू'ची उपलब्धता करून देण्यात आली आहे. अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत मतमोजणीसाठी 'पाडू'ची गरज भासल्यास बेल कंपन्याच्या तंत्रज्ञांच्या उपस्थितीत त्याचा वापर करण्यात येणार आहे. त्याचबरोबर 'पाडू'च्या वापराबाबत राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना या यंत्राचे प्रात्यक्षिक दाखविण्याचे निर्देश राज्य निवडणूक आयोगाने दिले होते. त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना प्रात्यक्षिक दाखविले आहे.

## थोडक्यात...

### एमआयएम उमेदवाराच्या गाडीवर दगडफेक

**मालेगाव :** निवडणुकीच्या रणधुमाळीत मालेगावातील दरेगाव शिवारात एमआयएम उमेदवार विशाल आहिरे यांच्या गाडीवर अज्ञातांनी हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. मध्यरात्री दोन वाजेच्या सुमारास आहिरे कामानिमित्त बाहेर जात असताना, मोटारसायकलवरून आलेल्या तीन अज्ञात व्यक्तींनी त्यांच्या गाडीवर भीषण दगडफेक केली. या हल्ल्यातून स्वतःचा बचाव करण्यासाठी आहिरे यांनी आपली गाडी थेट पोलीस ठाण्यात नेली. हा हल्ला राजकीय विरोधकांनीच केल्याचा आरोप विशाल आहिरे यांनी केला आहे. याप्रकरणी पवारवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

### काँग्रेस उमेदवाराच्या पतीवर हल्ल्याचा प्रयत्न

**नांदेड :** काँग्रेसच्या उमेदवाराच्या पतीवर हल्ला करण्याचा प्रयत्न झाल्याची घटना काल रात्री नांदेडमध्ये घडली. वार चुकवल्याने उमेदवाराचे पती बालंबाल बचावले. प्रभाग क्रमांक एकच्या उमेदवार सारिका भालेराव यांचे पती शिवाजी भालेराव शंकरनगर येथील आपल्या घरासमोर बसले असताना रात्री तीन दुचाकीवर सहा अज्ञात युवक आले आणि अचानक भालेराव यांच्यावर तलवार उगारली. भालेराव यांनी खुर्ची उचलल्याने बचावले. त्यानंतर हल्लेखोर बॅग घेऊन दुचाकीवरून पसार झाले. पळून जाताना हल्लेखोर एका लर्लीं कॅमेऱ्यात कैद झाले. पोलिसांना माहिती मिळताच सगळीकडे नाकाबंदी करण्यात आली. दरम्यान पोलीसाना ती बॅग एका ठिकानी मिळाली. त्या बॅगमध्ये केवळ कपडे होते. माहिती मिळताच काँग्रेसचे खासदार रवींद्र चव्हाण यांनी भालेराव यांची भेट घेतली.

### पुणे महापालिका मतदानासाठी तयारी पूर्ण

**पुणे :** पुणे महानगरपालिकेसाठी उद्या मतदान होत आहे. त्यासाठी प्रशासनाकडून मतपेट्या आणि मतदान साहित्याचे वितरण सुरू करण्यात आले आहे. शहरातील एकूण ४ हजार ११ मतदान केंद्रांवर आज दुपारी तीन वाजेपर्यंत मतदानासाठी लागणारे सर्व साहित्य पाठवले जाणार आहे. पीएमपीएल बसच्या माध्यमातून आणि कडक पोलीस बंदोबस्तात हे साहित्य संबंधित मतदान केंद्रांपर्यंत नेले जात आहे. मतदान प्रक्रिया शांततेत आणि सुरक्षित वातावरणात पार पडावी यासाठी प्रशासन आणि पोलीस यंत्रणा सतर्क आहे. सर्व तयारी अंतिम टप्प्यात असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

### दरोडेखोरांची पोलिसांनी काढली वरात

**हिंगोली :** हिंगोलीच्या कुरुंदा येथे जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या व्यवस्थापकाचा अपघात घडवून आठ लाख रुपये लुटणाऱ्या आरोपींची पोलिसांनी पायी वरात काढलीय, या कारवाईची जणसामान्यातून जोरदार चर्चा होऊ लागलीय. सहा दरोडेखोरांना हिंगोली पोलिसांनी आंध्रप्रदेशातील बापटला शहरातून अटक केली, या सहा दरोडेखोरांकडून ६ लाख ७० हजार रुपयांची रक्कम जप्त करण्यात आलीय, या प्रकरणात एकूण नऊ आरोपींना हिंगोली पोलिसांनी अटक केलीय. हिंगोली जिल्ह्यातील कुरुंदा पोलीस स्टेशन हद्दीतील चोंडी जिल्हा बँक शाखेचे व्यवस्थापक ८ लाख रुपयांची रोकड असलेली बॅग घेऊन मोटरसायकलने वसमत वरून हिंगोली कडे जात असताना पिकअपने त्यांना धडक देऊन त्यांच्याकडील पैशाची बॅग चोरट्यांनी लंपास केल्याची घटना घडली होती.

### वोटर स्लिप आढळल्याने खळबळ

**पुणे :** पुण्यातील प्रभाग ४० मध्ये रोख रक्कम आणि वोटर स्लिप आढळल्याने खळबळ, दोन गाड्या पोलिसांच्या ताब्यात. पुणे महापालिका निवडणूक अंतिम टप्प्यात असताना प्रभाग क्रमांक ४० कोंढवा-येवलेवाडी परिसरात आचारसंहितेच्या उल्लंघनाचा संशयास्पद प्रकार उघडकीस आला आहे. येवलेवाडी पोलीस स्टेशनच्या हद्दीत एम.एच.-आर.एल.-३००९ क्रमांकाची इनोव्हा व एम.एच.-१२, क्यू.सी.-३००९ क्रमांकाची मारुती ब्रेझा या दोन गाड्यांमध्ये रोख रक्कम, वोटर स्लिप, राष्ट्रवादी काँग्रेसचे घड्याळ चिन्ह असलेले पक्षाचे पॅम्प्लेट आढळून आले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार इनोव्हा गाडीत अंदाजे एक लाख रुपये सापडले आहेत. गाड्या ताब्यात घेण्यात आल्या आहेत.

### रोजच्या रोज कायदे बदलताहेत : ठाकरे

**मुंबई :** निवडणुकीच्या तोंडावर रोजच्या रोज कायदे बदलत आहेत. मला सगळ्यांना सांगायचं आहे की सतर्क राहा. सत्ताधारी पक्षांच्या उमेदवारांवर लक्ष ठेवा. उमेदवारांकडून मतदारांना पैसे वाटले जात आहेत. लोक नाकारतसुद्धा आहे. या सगळ्यात हरलेली गोष्ट जिंकण्यासाठी निवडणूक आयोग सरकारला मदत करतंय, हा आमचा आरोप आहे, असं राज ठाकरे म्हणाले.

### टोल नाक्यावर वाहनांची कसून तपासणी

**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक ठिकाणी स्थिर सर्वेक्षण पथकाकडून वाहनांची कसून चौकशी करण्यात येत आहे. याच पार्श्वभूमीवर जालना छत्रपती संभाजीनगर रोडवर नागेवाडी टोलनाक्याजवळ असलेल्या एसएसटी पथकाकडून देखील वाहनांची कसून तपासणी करण्यात येत आहे.

# मनसेची याचिका उच्च न्यायालयाने फेटाळली

### याचिकाकर्त्यांना सुनावले खडेबोल; ६६ नगरसेवकांच्या 'बिनविरोध'चा मार्ग मोकळा

**मुंबई :** राज्यातील महानगरपालिका निवडणुकीत ६६ नगरसेवकांच्या बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला असून, याविरोधात मनसेच्या अविनाश जाधव यांनी दाखल केलेली याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळली आहे. उमेदवार बिनविरोध निवडून आला असला, तरी मतदारांसाठी नोटाचा पर्याय असावा, अशी मागणी याचिकेत करण्यात आली होती.

मात्र, न्यायालयाने याचिकाकर्त्यांना खडे बोल सुनावत ही याचिका फेटाळून लावली. तुम्ही न्यायालयात सकाळी चुकीचा युक्तिवाद केला, तसेच रिट पिटिशन आणि आधीच्या याचिकेत सार्धम्य असल्याचे सांगितले, मात्र यामध्ये काहीही साम्य आढळून आलेले नाही, त्यामुळे आम्ही याचिकाकर्त्यांना दंड ठोठावत असल्याचे सुरुवातीला न्यायमूर्तींनी सांगितले.

बुधवारी सकाळी ही याचिका इतर प्रलंबित याचिकांसारखीच असल्याचे नमूद करण्यात आले होते. मात्र, सुनावणीसाठी याचिका पुकारण्यात आल्यानंतर ऑनलाईन उपस्थित असलेले असीम सरोदे यांनी सांगितले की ही याचिका तत्सम नसून निवडणुकीशी संबंधित आहे. यामुळे मुख्य न्यायाधीश चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम ए. अंखड यांच्या खंडपीठाने नाराजी व्यक्त केली. चुकीचे विधान केल्याबद्दल आम्ही तुमच्यावर दंड लावणार आहोत आणि याचिका फेटाळणार आहोत, असे हायकोर्टाकडून सांगण्यात आले. एखाद्या पक्षकारासाठी अशी चुकीची माहिती देण्यामागे तुमची घाई किंवा भीती काय होती?, असा सवालही न्यायालयाने याचिकाकर्त्यांना विचारला. शेवटी न्यायालयाने दंड न आकारता ही याचिका फेटाळून लावली.

राज्यातील २९ महानगरपालिकांमध्ये मतदान होण्यापूर्वीच ६६ उमेदवार विजयी झाले आहेत. निवडणुका बिनविरोध करण्यात भाजपाने आघाडी घेतली असून, भाजपचे ४४ उमेदवार बिनविरोध विजयी झाले आहेत. त्यापाठोपाठ निवडणुका बिनविरोध करण्यात शिवसेनेने दुसरा क्रमांक पटकावला आहे. शिंदेंच्या शिवसेनेते १९ नगरसेवक बिनविरोध विजयी झाले आहेत.

# परप्रांतियांना मारणं म्हणजे मुंबईचा विकास नव्हे : मुख्यमंत्री

### वरळीच्या बीडीडी चाळीतून भरला प्रचाराचा हुंकार

**मुंबई :** महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराचा शेवटचा टप्पा गाठलेला असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वरळीतील बीडीडी चाळीला भेट देऊन राजकीय वातावरण तापवले आहे. मराठी माणसाचा विकास केला म्हणजे नक्की काय केले? गेल्या २५ वर्षांत मराठी माणसाला मुंबई सोडून बाहेर का जावे लागले? असा सवाल करत त्यांनी उद्धव



आणि राज ठाकरे यांच्या कार्यशैलीवर जोरदार प्रहार केला. ठाकरे बंधूंच्या भाषिक राजकारणावर टीका करताना फडणवीस म्हणाले की, परप्रांतीयांना दोन थोबाडीत मारणे म्हणजे विकास असू शकत नाही. ठाकरे बंधूंनी मराठी विरुद्ध अमराठी असा भेदभाव करून निवडणूक लढवण्याचा प्रयत्न केला, मात्र मराठी माणूस संकुचित नाही. त्याला क्षेत्रीय अस्मिता आणि भाषेचा अभिमान नक्कीच आहे, पण त्याला प्रगती हवी आहे.

हिंदुत्वाच्या मुद्यावर बोलताना मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले की, आमचे हिंदुत्व हे केवळ पूजा पद्धतीपुरते मर्यादित नाही. जे प्राचीन भारतीय जीवनपद्धती मानतात, ते सर्व आमच्यासाठी हिंदू आहेत. मराठी माणूस महाराष्ट्रात सुरक्षित आणि समृद्ध असावा, हेच आमचे ध्येय असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.



जळगावच्या ममुराबाद नाका परिसरात निवडणूक आयोगाच्या स्थिर सर्वेक्षण पथकाने नाकेबंदी दरम्यान एका कारची झडती घेतली. या कारमध्ये तब्बल २९ लाख रुपयांची रोकड, ३ किलो चांदी आणि ८ तोळे सोने आढळून आले. कारमधील व्यक्तींनी हा मुद्देमाल बऱ्हाणपूर येथील सराफ पेढीचे मालक दामोदरदास गोपालदास श्रॉफ यांचा असल्याचे सांगितले. मात्र, जागेवर कोणतीही अधिकृत कागदपत्रे किंवा पावत्या सादर न केल्यामुळे पोलिसांनी हा सर्व ऐवज जप्त करून सरकारी कोषागार विभागात जमा केला आहे.

# महाराष्ट्रात रात्रभर कोंबिंग ऑपरेशन

### जळगावात २९ लाखांची रोकड, सोने-चांदी जप्त; वसईमध्ये राजकीय पक्षांत राडा

**जळगाव :** महाराष्ट्रातील २९ महानगरपालिका निवडणुकांसाठी उद्या मतदान होणार आहे. या मतदानाची तारीख जवळ येत असतानाच आता राजकीय वातावरण कमालीचे तापले आहे. प्रचाराच्या तोफा थंडावल्यानंतर आता छुप्या पद्धतीने पैसे वाटप होत असल्याचे पाहायला मिळत आहे. राज्यातील विविध मतदारसंघांमध्ये पैसे वाटपाच्या संशयावरून मुंबई, वसई आणि डोंबिवलीत राजकीय पक्ष एकमेकांसमोर उभे ठाकले आहेत. या संघर्षाचे रूपांतर हाणामारी आणि थेट हत्येच्या प्रयत्नासारख्या गंभीर गुन्ह्यांमध्ये झाले आहे.

डोंबिवलीतील प्रभाग क्रमांक २९ मध्ये सर्वात गंभीर परिस्थिती पाहायला मिळत आहे. डोंबिवलीत भाजप आणि शिवसेना शिंदे गटात मैत्रीपूर्ण लढत सुरु असतानाच पैसे वाटपाच्या आरोपावरून दोन्ही पक्षांचे कार्यकर्ते आमनेसामने आले आहेत. या वादाचे रूपांतर तुंबळ हाणामारीत झाले. ज्यामध्ये ४ कार्यकर्ते गंभीर जखमी झाले आहेत.

भाजप उमेदवाराचे पती सोमनाथ नाटेकर यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी शिवसेनेच्या दोन उमेदवारांसह पाच जणांवर कलम ३०७ (हत्येचा प्रयत्न) अंतर्गत गुन्हा दाखल केला. रात्री उशिरा पोलिसांनी रुग्णालयात उपचार घेत असलेले शिवसेना उमेदवार नितीन पाटील आणि रवी पाटील यांना ताब्यात घेतले.

या कारवाईनंतर शिवसेनेचे आमदार राजेश मोरे यांनी संताप व्यक्त केला आहे. ही प्रशासकीय दडपशाही असल्याचे म्हटले आहे. तर माझ्या पतीच्या जिवाला काही झाले तर प्रशासन जबाबदार असेल, असा इशारा नितीन पाटील यांच्या पत्नी रंजना पाटील यांनी दिला आहे. सध्या डोंबिवलीत मोठ्या प्रमाणात अतिरिक्त पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

# राजकीय हिंसाचारात पाच जखमी

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर महापालिका निवडणुकीसाठी आज मतदान होत असतानाच शहरात राजकीय हिंसाचाराने उग्र रूप धारण केलं आहे. पैशांच्या वाटपाच्या वादातून आणि पक्षीय संघर्षातून झालेल्या तुफान हाणामारीत पाच जण गंभीर जखमी झाले आहेत. काही ठिकाणी गुन्हे दाखल होत असताना, काही प्रकरणं मात्र आपापसातच मिटवली जात असल्याने पोलिसांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत.

प्रभाग क्रमांक १५ सह विविध भागांत सत्ताधारी भाजप आणि एकनाथ शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये जोरदार हाणामारी झाली. या हिंसाचारात सिद्धांत देवकर, आर्यन एकाडे, स्वाती गाडळकर, अभिजित दळवी आणि हिमांशु जाधव हे पाच जण गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

काल रात्री १५ ते १७ जणांनी एका तरुणावर हल्ला केल्यानंतर प्रत्युत्तरादाखल दुसऱ्या गटाकडूनही मारहाण करण्यात आली. काही ठिकाणी चाकू हल्ल्याच्या घटनाही समोर आल्या आहेत.

या प्रकरणी भाजप उमेदवार दत्ता गाडळकर आणि शिवसेनेच्या उमेदवारांकडून परस्परविरोधी तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत.

### मंदिरात एंट्रीसाठी आधार कार्ड सक्तीचं

**तुळजापूर :** मकर संक्रांतीचा सण राज्यभर उत्साहात साजरा होत आहे. पुण्यातील श्रीमंत दगडूशेठ गणपती मंदिरात भाविकांची गर्दी उसळली आहे. दुसरीकडे, तुळजाभवानी मंदिरात मकर संक्रांतीनिमित्त ओवाळणीसाठी येणाऱ्या महिलांना आधार कार्ड सक्तीचे केले आहे. या निर्णयामुळे प्रवेशाचे नियम बदलले आहेत. मंदिर संस्थानाने हा निर्णय घेतल्याचे समजते. आधार कार्डशिवाय महिलांना प्रवेश मिळणार नाही असे सांगितले आहे.

# एमआयएमच्या उमेदवारावर हल्ला

**मालेगाव :** राज्यभरात महापालिका निवडणुकांचा प्रचार शिगेला पोहोचून आता प्रचाराच्या तोफा थंडावल्या असताना मालेगावमधून एक खळबळजनक घटना समोर आली आहे. मतदानाच्या तोंडावर एमआयएमच्या उमेदवारावर झालेल्या हल्ल्यामुळे राजकीय वातावरण तापले असून, निवडणूक प्रक्रियेच्या सुरक्षिततेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मालेगाव शहरातील प्रभाग क्रमांक ४ मधून एमआयएमकडून निवडणूक लढवणारे उमेदवार विशाल आहिरे यांच्यावर रात्री उशिरा अज्ञात व्यक्तींनी हल्ला केल्याची घटना घडली. या हल्ल्यात आहिरे यांच्या वाहनाच्या काचा फोडण्यात आल्या असून, सुदैवाने ते या घटनेतून सुखरूप बचावले. या प्रकारामुळे संपूर्ण शहरात एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, विशाल आहिरे हे आपल्या पोलिंग एजंट्सची बैठक आटोपून घरी परतत होते. त्याच वेळी मुंबई-आग्रा महामार्गावर दुचाकीवरून आलेल्या अज्ञात व्यक्तींनी त्यांच्या वाहनाला अडवण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर अचानक दगडफेक करत वाहनाच्या काचा फोडण्यात आल्या.

अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे परिस्थिती गंभीर बनली होती. मात्र, प्रसंगावधान राखत विशाल आहिरे यांनी आपली गाडी वेगाने सायनेगावच्या दिशेने नेत घटनास्थळावरून पलायन केले. त्यामुळे पुढील अनर्थ टळला आणि त्यांचा जीव वाचला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.

# मतदारांना प्रलोभन देण्याचा प्रयत्न, १९ वॉशिंग मशीन जप्त

### भरारी पथकाची तातडीची कारवाई

**पुणे :** महानगरपालिका निवडणुकीच्या मतदान प्रक्रियेसाठी अवघे काही तास उरलेले असताना आणि प्रचारावर बंदी असतानाही मतदारांना वेगवेगळ्या पद्धतीने प्रलोभन दाखवले जात असल्याचे प्रकार उघडकीस येत आहेत. पुणे आणि पिंपरी चिंचवड परिसरात निवडणुकीच्या काळात मतदारांना वॉशिंग मशीन तसेच चांदीची भांडी वाटली जात असल्याची माहिती समोर आलीय.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीदरम्यान मतदारांना वॉशिंग मशीन वाटप केले जात असल्याची तक्रार मिळाल्यानंतर निवडणूक प्रशासनाच्या भरारी पथकाने कारवाई करत तब्बल १९ वॉशिंग मशीन जप्त केल्या आहेत. रहाटणी परिसरातील गणराज कॉलनी येथे मतदारांना वॉशिंग मशीनच वाटप केले जात असल्याची तक्रार मिळाली होती. या तक्रारीच्या आधारे निवडणूक प्रशासनाचे भरारी पथक तत्काळ घटनास्थळी दाखल झाले आणि १९ वॉशिंग मशीन जप्त केल्या. या प्रकरणी काळेवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

निवडणूक प्रशासनाच्या भरारी पथकाने केलेल्या कारवाईत १९ नव्या वॉशिंग मशीन जप्त करण्यात आल्या आहेत. रहाटणी परिसरात मतदारांना वॉशिंग मशीनचं वाटप केले जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर भरारी पथकाने छापेमारी केली.




# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## जि.प., पं.स. सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १४ जानेवारी :** राज्य निवडणूक आयोगाने लातूर जिल्हा परिषद आणि त्याअंतर्गत असलेल्या लातूर, औसा, रेणापूर, चाकूर, अहमदपूर, उदगीर, जळकोट, निलंगा, शिरूर अनंतपाळ व देवणी सर्व १० पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यामुळे या क्षेत्रांमध्ये आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली असून, ही आचारसंहिता निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अंमलात राहील, असे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे.

राज्य निवडणूक आयोगाने घोषित केलेल्या कार्यक्रमानुसार १६ जानेवारी २०२६ रोजी निवडणुकीची अधिसूचना प्रसिद्ध होईल. १६ जानेवारी ते २१ जानेवारीपर्यंत सकाळी ११ ते दुपारी ३ पर्यंत या कालावधीत नामनिर्देशन पत्रे स्वीकारली जातील. १८ जानेवारी रोजी सार्वजनिक सुट्टी असल्याने अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. तसेच २२ जानेवारी रोजी नामनिर्देशन पत्रांची छाननी होईल. २३, २४ आणि २७ जानेवारी २०२६ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत अर्ज मागे घेता येतील. २७ जानेवारी रोजी दुपारी ३:३० नंतर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी व चिन्ह वाटप होईल. मतदान ५ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ७:३० ते संध्याकाळी ५:३० पर्यंत मतदान होईल. मतमोजणी ७ फेब्रुवारी रोजी होणार आहे.



# मतदान पथके मतदान साहित्यासह मतदान केंद्रावर रवाना

**लातूर शहर मनपाच्या ७० जागांसाठी आज मतदान । ३७५ मतदान केंद्रावर मतदान । ३ सखी तर ६ आदर्श मतदान केंद्र**







**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १४ जानेवारी :** लातूर शहर महानगरपालिकेच्या एकूण ७० जागांसाठी गुरुवारी मतदान होणार आहे. शहरातील एकूण ३७५ मतदान केंद्रावर ही मतदान प्रक्रिया होणार आहे. त्यासाठीचेआवश्यक साहित्य घेऊन या निवडणुकीसाठी नियुक्त करण्यात आलेली मतदान पथकांनी बुधवारी शासकीय महिला तंत्रनिकेतन येथून मतदान साहित्य घेऊन आपआपल्या मतदान केंद्राकडे रवाना झाले.मनपा निवडणुकीचीसर्व तयारी पूर्ण झाली असून मतदारांनीं आपला मतदानाचा अधिकार अवश्य बजावावा, असे आवाहन प्रशासनासह विविध स्वयंसेवी संस्थांच्या वतीने करण्यात आले आहे. शहरातील वैद्यकीय व्यावसायिक, औषधी विक्रेते, विविध व्यापाऱ्यांनी मतदानाचा हक्क बजावणाऱ्या मतदारांसाठी आकर्षक सवलतीही जाहीर केल्या आहेत. मतदानाचा टक्का वाढावा हाच यामागचामुख्य उद्देश आहे. २०१७ नंतर प्रथमच होणाऱ्या लातूरशहर मनपाच्या या तिसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत मतदार राजा कोणाच्या पारड्यात आपल्या मतांचे दान टाकेल याकडे सगळ्यांचे लक्ष लागून राहिले आहे. गुरुवारीमतदान झाल्यानंतर लगेच शुक्रवारी मतमोजणी होणार आहे. त्यामुळे निकालासाठी उमेदवारांसह मतदारांचीही उत्सुकता फार काळ ताणली जाणारनाही. लातूरचासुजाण मतदार या निवडणुकीत कोणाच्या बाजूने कौल देणार? या प्रश्नाचे उत्तर शुक्रवारीदुपारपर्यंत मिळणार आहे.

**२०० मीटर परिसरात प्रतिबंधात्मक आदेश**

लातूर शहर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीनिमित्त १५ जानेवारी २०२६ शांतता, निर्भयता आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अंतर्गत आदेश जारी केला आहे. या आदेशानुसार लातूर शहरातील सर्व मतदान केंद्रांपासून २०० मीटर परिसरात विविध प्रतिबंध लागू करण्यात आले आहेत.

राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रमानुसार महानगरपालिका निवडणुकीसाठी १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान होणार आहे. जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार मतदान सुरू झाल्यापासून ते मतदान संपेपर्यंत मतदान केंद्र परिसरात प्रतिबंध लागू राहतील.

मतदान केंद्रापासून २०० मीटर परिसरात मंडपे, दुकाने किंवा तात्पुरत्या रचनांचे उभारणे पूर्णपणे प्रतिबंधित राहील. मोबाईल फोन, स्मार्ट फोन, कॉर्डलेस फोन, पेजर, वायरलेस सेट, ध्वनीक्षेपक (लाउडस्पीकर) व इतर कोणत्याही इलेक्ट्रॉनिक उपकरणे बाळगणे किंवा वापरणे यावर बंदी राहील. निवडणूक कामाशी संबंधित नसलेली खाजगी वाहने आणणे, संबंधित पक्षाचे चिन्हे प्रदर्शित करणे, निवडणूक कामाशी संबंधित नसलेल्या व्यक्तींना मतदान केंद्र परिसरात प्रवेश करण्यास मनाई राहील.

हे आदेश फक्त मतदान दिवशी सकाळी मतदान सुरू होण्यापासून ते संपूर्ण मतदान प्रक्रिया संपेपर्यंत अंमलात राहतील. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे आदेशात स्पष्ट केले आहे.

## मकरसंक्रांतीदिवशी दोन दुकानाला आग; लाखोंचे झाले नुकसान

**त.भा. वृत्तसेवा,**

**वलांडी, १४ जानेवारी :** देवणी शहरात मकरसंक्रांतीच्या दिवशी दोन दुकानाला आग लागल्याने लाखोचे नुकसान झाले आहे.



देवणी शहरातील मिनी मार्केट आवारातील डोंगरे कॉम्पलेक्स मधील श्री मोबाईल शॉपी, अप्पा कलेक्शन, भावना लेडिज एम्पोरियम या तीन पत्र्याच्या शेडच्या दुकानांना आज मकरसंक्रांतीच्यादिवशी सायंकाळी ५ च्या सुमारास मोबाईल शॉप, कापड दुकान असल्याने आगीने रौद्ररूप धारण केले होते. अचानक लागलेल्या आगीमुळे गोंधळ उडाला होता.

नागरिकांनी तात्काळ अग्निशमन दलाला यावेळी तात्काळ पाचारण करण्यात आले होते त्यामध्ये नगरपंचायत अग्निशमन दलाचे विभागप्रमुख नाजीम मोमीन,मुनाफ शेख यांनी घटनास्थळी तात्काळ दाखल होत आग आटोक्यात आणली. कापड दुकान आगीच्या भक्ष्यस्थानी पडले होते त्यात लाखों रूपयांचे नुकसान झाल्यांचा अंदाज व्यापाऱ्यांकडून व्यक्त केला जात आहे.घटनास्थळी देवणी ग्राम महसूल अधिकारी लक्ष्मण कांबळे यांनी पाहणी केली. त्याच बरोबर पोलिस सहायक निरीक्षक भीमराव गायकवाड, नगरपंचायतचे उपनगराध्यक्ष अमित मानकरी यांनी भेट देऊन पाहणी केली.

## बनावट सोने-बिस्किटांच्या आधारे फसवणूक करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १४ जानेवारी :** बनावट सोन्याच्या बिस्किटांच्या आधारे नागरिकांची आंतरजिल्हा टोळीचा लातूर पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला असून पाच आरोपीना अटक केले आहे. या आरोपींकडून ९ लाख रुपयांचा मुद्देमालही जप्त करण्यात आला आहे. या टोळीचा मुख्य सूत्रधार संदीप दगडू जाधव हा फरार आहे.

मागील काही काळापासून ही टोळी जिल्हाभरात नकली सोन्याचे बिस्कीट, अंगठ्या व इतर दागिने तयार करून खरे सोने असल्याचा आभास निर्माण करत सामान्य नागरिकांची फसवणूक करीत होती. विशेषतः महिला, वृद्ध नागरिक व एकटे प्रवास करणारे लोक यांना लक्ष्य करून ही टोळी अत्यंत चलाखीने आपला गुन्हेगारी उद्योग चालवत होती. पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी नमूद प्रकारच्या टोळीचा शोध घेऊन कारवाई करण्याबाबत मार्गदर्शन करून सूचना केल्या होत्या.

त्या अनुषंगाने अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक





सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे विशेष पथक लातूर जिल्ह्यात नकली सोने देऊन फसवणूक करणाऱ्या आरोपींचा अनेक दिवसापासून शोध वेगवेगळ्या मार्गाने माहिती संकलित करून विश्र्लेषण करण्यात येत होते. दरम्यान विशेष पथकाला दि. १३ जानेवारी रोजी गरुड चौक, लातूर परिसरात गुप्त बातमीदाराकडून खात्रीशीर माहिती मिळाली की, गरुड चौक ते राजीव गांधी चौक रिंग रोडवरील सिंकंदरपूर जाणाऱ्या रस्त्यावर एक टाटा इंडीगो कार व एक होंडा एक्टिवा स्कूटीसह काही इसम बनावट सोन्याचे बिस्कीट विक्री करून फसवणूक करण्यासाठी थांबले आहेत.

माहितीची खात्री होताच पथकाने सापळा रचून अभिमान राजेंद्र कांबळे, धनंजय बालाजी गायकवाड, बालाजी प्रशांत कांबळे, बालाजी विठ्ठल गायकवाड व सचिन बालाजी गायकवाड या पाच जणांना ताब्यात घेतले. त्यांची झडती घेतली तेव्हा त्यांच्याकडे अंदाजे ४२ ग्रॅम खरे सोन्याचे दागिने, रोख रक्कम, नकली सोन्याचे बिस्कीट १६ नग, नकली अंगठ्या ३ नग, टाटा इंडीगो कार (एमएच २३ वाय ९२२२) होंडा एक्टिवा (एमएच २४ बी झेड ९३०८-इन ९३०८) असा एकूण ९ लाख १ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**- लातूरच्या स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई**
**- ५ आरोपी अटकेत**
**- ९ लाखांचा मुद्देमाल जप्त**

सदरची कारवाई पोलिसाधिक्षक अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या विशेष पथकातील सहाय्यक पोलीस निरीक्षक सदानंद भुजबळ, पोलीस उप निरीक्षक अमर केंद्रे, राजेश घाडगे, प्रमोद देशमुख, पोलीस अमलदार साहेबराव हाके, रियाज सौदागर, राजेश कंचे, मोहन सुरवसे, युवराज गिरी, मनोज खोसे, आनंद हल्लाळे, प्रवीण कोळसुरे, सिद्धेश्र्वर मदने, जमीर शेख, राहुल कांबळे, प्रदीप चोपणे, व्यंकटेश निटुरे, संतोष खांडेकर, शैलेश सुडे, महिला पोलीस अंमलदार सुरेखा मदने, अंजली गायकवाड यांनी केली आहे.

## चिमुकल्यांच्या भारुडातून मतदानाचा जागर

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १४ जानेवारी :** लातूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या पार्श्र्वभूमीवर मतदारांमध्ये मतदानाबाबत जनजागृती निर्माण व्हावी आणि १५ जानेवारी २०२६ रोजी प्रत्येक नागरिकाने आपला मतदानाचा हक्क बजावावा, या उद्देशाने मतदान जनजागृती विभाग डतएएझ (स्वीप) यांच्या माध्यमातून शहरभर विविध सांस्कृतिक उपक्रम राबविण्यात येत आहेत.

हा उपक्रम महानगरपालिका आयुक्त मानसी मीना, उपायुक्त पंजाबराव खानसुळे, मनपा शिक्षणाधिकारी श्वेता नागणे, शालेय शिक्षण विभागाचे मधुकर ढमाले, सतीश भापकर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असून, याच उपक्रमांतर्गत महानगरपालिका शाळा क्रमांक ६ येथील इयत्ता पहिली ते




चौथीच्या विद्यार्थ्यांनी 'मतदानाचा बुरगुंडा' हे प्रभावी भारुड सादर करून नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.

या भारुडामध्ये बाल भारुडकार कु. आदित्री सोमवंशी हिने प्रमुख भूमिका साकारली असून तिला कु. गायत्री आगलावे, कु. वैशाली पवार, कु. स्वरा सोनटक्के, कु. मुकेश सूर्यवंशी, कु. बळीराजा डोमपल्ले व कु. शिवांश होगाडे यांनी उत्स्फूर्त साथ दिली. ढोलकीवादनाची जबाबदारी कु. गणेश सातपुते यांनी समर्थपणे सांभाळली. हे मतदान जनजागृतीपर भारुड गंजगोलाई, राजीव गांधी चौक, पाच नंबर चौक, गरुड चौक, विवेकानंद चौक, मार्केट यार्ड, बसवेश्र्वर चौक, बौद्ध नगर, आंबेडकर चौक, शाहू चौक, सम्राट चौक, सुभाष चौक, हत्ते नगर यांसह शहरातील विविध प्रमुख चौकांमध्ये तसेच १८ प्रभागांतील गजबजलेल्या ठिकाणी सादर करण्यात आले.

## बालकिशन आडसूळ यांचा भाजपात प्रवेश



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १४ जानेवारी :** भारतीय जनता पार्टीचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष यांच्या प्रमुख उपस्थितीत बालकिशन आडसूळ यांचा भारतीय जनता पार्टीत थाटात प्रवेश झाला.

मूळचे भाजपचे असणाऱ्या बालकिशन आडसूळ यांनी काही कारणास्तव मध्यंतरी भाजपचा त्याग केला होता. मात्र, लातूर शहर महानगरपालिकेच्या निवडणूक प्रचारादरम्यान दि. ११ जानेवारी ०२६ रोजी त्यांनी भाजपात घरवापसी केली. याप्रसंगी माजी आमदार पाशा पटेल, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके, माजी जि. प. सदस्य राजकुमार कलमे यांच्यासह भाजपचे अनेक पदाधिकारी-कार्यकर्ते उपस्थित होते.

## मराठवाडास्तरीय पत्रकारीता पुरस्काराने जेवरीकर, थोरात, मिरजकर सन्मानित

**पत्रकारांची लेखणी ही तलवारीपेक्षा अधिक धारदार असते : ना. बाबासाहेब पाटील**

**त.भा. वृत्तसेवा,**

**चाकूर, १४ जानेवारी :** समाजाच्या जडणघडणीत पत्रकारांची भूमिका फार महत्वाची असून खऱ्या अर्थाने पत्रकारांच्या लेखणीतूनच समाजाचे प्रतिबिंब उमटते.पत्रकार हा प्रशासन व लोकप्रतिनिधी यांच्यातील दुवा असून पत्रकारांची लेखणी ही तलवारीपेक्षा अधिक धारदार असते असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी केले.

ते चाकूर येथील भाई किशनराव देशमुख महाविद्यालयाच्या सभागृहात चाकूर सिटी प्रेस क्लबच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मराठवाडा स्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यात बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.सर्जेराव शिंदे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून नगराध्यक्ष करीमसाहेब गुळवे, उपनगराध्यक्ष साईप्रसाद हिपाळे, पोलीस निरीक्षक बालाजी भंडे, जेष्ठ पत्रकार अनिल वाडकर, कामगार नेते पप्पूभाई शेख उपस्थित होते.

पुढे बोलताना सहकार मंत्री पाटील म्हणाले की पत्रकारिता ही समाजाला न्याय देण्यासाठी असून सामाजिक बांधिलकी समजून पत्रकारिता करणे आवश्यक असते. पुरस्कार छोटा आहे किंवा किती मोठा आहे हे महत्वाचे नसते तर त्या पुरस्काराच्या पाठीमागील भावना महत्वाच्या असतात. सिटी प्रेस क्लब चाकूरने पुरस्कारासाठी अत्यंत योग्य पत्रकारांची निवड केली आहे.अशाच पद्धतीने त्यांनी विविध क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनाही सन्मानित




करावे अशी अपेक्षा पाटील यांनी व्यक्त केली.

या शानदार समारंभात बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते जेष्ठ पत्रकार संजय जेवरीकर यांना स्व.नागोराव संभाजी शिंदे यांच्या स्मरणार्थ पत्रकार अ. ना.शिंदे यांच्यावतीने 'राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार', मुंबई येथील वरिष्ठ सहाय्यक संचालक,जनसंपर्क विभागातील काशीबाई थोरात यांना स्व.काशीबाई बळीराम सोनटक्के यांच्या स्मरणार्थ जेष्ठ स्वातंत्र सैनिक बळीरामजी सोनटक्के व पत्रकार संगमेश्वर जनगावे यांच्या वतीने राज्यस्तरीय पत्रकार भूषण पुरस्कार तर , ज्येष्ठ पत्रकार अभय मिरजकर यांना कालवश मालनबाई सोपानराव कांबळे व कालवश सोपान काशीराम कांबळे यांच्या स्मरणार्थ पत्रकार मधुकर कांबळे यांच्या वतीने 'राज्यस्तरीय मायदादा वृत्तरत्न पुरस्कार' देऊन सन्मानीत करण्यात आले.

याप्रसंगी पुरस्कार प्राप्त सन्मानार्थी पत्रकार संजय जेवरीकर, काशीबाई थोरात, अभय मिरजकर यांनी सत्काराला उत्तर देत यथोचीत मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ.सर्जेराव शिंदे यांनी केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सिटी प्रेस क्लबचे सचिव मधुकर कांबळे यांनी केले. अध्यक्ष प्रा. अ. ना. शिंदे यांनी पुरस्कार प्राप्त सन्मानार्थी यांच्या कार्याच्या आढावा घेत परिचय करून दिला. या कार्यक्रमास शरद किनीकर, दिलीप पाटील, संदीप शेटे,प्रा. डॉ. बी. डी. पवार यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती. कार्यक्रमासाठी संगमेश्वर जनगावे, सतिश गाडेकर, सलीम तांबोळी, सुनील भोसले, के. आर. वाघमारे, विजय शिंदे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रा. डॉ.राजेश तगडपल्लेवार यांनी तर आभारप्रदर्शन सलीम तांबोळी यांनी केले.

## थोडक्यात...

### रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत नेत्र तपासणी




**अहिल्यानगर :** केंद्र शासनाच्या सडक परिवहन मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार १ ते ३१ जानेवारी दरम्यान सडक सुरक्षा – जीवन रक्षा या संकल्पनेवर आधारित जिल्ह्यामध्ये रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात येत आहे. याच अभियानातील एक उपक्रम म्हणून शहर वाहतूक नियंत्रण शाखेच्यावतीने गुरुवार, १३ जानेवारी रोजी वाहन चालकांच्या नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यात सुमारे १५० वाहनचालकांचची नेत्र तपासणी करण्यात आली. या शिबिरासाठी डॉ. रोहित थोरात, डॉ. आर्यन कराळे, डॉ. निलेश कदम, शुभम शिंदे यांनी मोलाचे योगदान दिले.

### 'केस नं.७३' मधून अशोक शिंदे 'डॉ. श्रीकांत'च्या भूमिकेत!

**छत्रपती संभाजीनगर :** रंगमंच, मालिका आणि चित्रपट या तिन्ही माध्यमांमध्ये आपला ठसा उमटवणारे अभिनेते अशोक शिंदे आगामी 'केस नं.७३' या मराठी चित्रपटातून एका वेगळ्या भूमिकेत प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. या निमित्ताने ते बऱ्याच काळानंतर मराठी रुपेरी पडद्यावर दिसणार आहेत. चित्रपटात अशोक शिंदे यांनी मनोवैज्ञानिक डॉ.श्रीकांत ही आव्हानात्मक व्यक्तिरेखा साकारली आहे. नुकताच या गूढ चित्रपटाचा टिझर प्रदर्शित झाला असून, भय, वास्तव आणि भ्रमाच्या विळख्यातील रहस्य डॉ. श्रीकांत कसे उलगडतात, हे पाहणं उत्सुकतेचं ठरणार आहे. डॉ. मिलिंद मुक्तेश्वर आपटे यांनी चित्रपटाचे दिग्दर्शन केले असून यात अशोक शिंदे यांच्यासह राजसी भावे, शैलेश दातार, नंदिता पाटकर आणि पियुष आपटे अशी तगडी स्टारकास्ट आहे.

### पीएनजी ज्वेलर्स तर्फे २०२६ चे 'चेन अँड बँगल्स महोत्सव'ने स्वागत

**छत्रपती संभाजीनगर :** भारतातील सर्वाधिक विश्र्वासार्ह वारसाहक्क लाभलेला दागिन्यांचा ब्रँड पीएनजी ज्वेलर्स पुन्हा एकदा आपल्या बहुप्रतिक्षित चेन अँड बँगल्स महोत्सवासह सज्ज झाला आहे. ५ जानेवारी २०२६ पासून देशभरातील सर्व पीएनजी ज्वेलर्स शोरूम्समध्ये सुरू होणारा हा महिनाभराचा महोत्सव, दैनंदिन वापरासाठी तसेच सण-समारंभांसाठी उपयुक्त अशा दोन प्रकारचे दागिने ग्राहकांना उपलब्ध करून देतो. या महोत्सवात दैनंदिन वापरासाठी लागणारे दागिने, भेटवस्तू किंवा खास प्रसंगांसाठी अनुरूप अशा उत्तम दर्जाच्या सोन्याच्या चेन, आकर्षक बांगड्या तसेच अतिशय सुंदर अशा हिऱ्यांच्या बांगड्यांचा समावेश आहे. उत्कृष्ट कारागिरी आणि दीर्घकाळ टिकणारी डिझाईन्स असलेले दागिने ग्राहकांना उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.महोत्सवाच्या अंतर्गत, ग्राहकांना सोन्याच्या चेन आणि बांगड्यांवर प्रति ग्रॅम रुपये ५१५ इतकी थेट मेकिंग चार्ज सवलत मिळणार आहे. यासोबतच, हिऱ्याच्या बांगड्यांच्या मेकिंग चार्जवर थेट ५० टक्के सूट देण्यात येत आहे. ही ऑफर ५ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत सर्व पीएनजी ज्वेलर्स शोरूम्समध्ये वैध असेल.

### 'टोयोटा ड्रीम कार आर्ट कॉन्टेस्ट'च्या १९ व्या एडिशनची घोषणा

**छत्रपती संभाजीनगर :** टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम)ने आज टोयोटा ड्रीम कार आर्ट कॉन्टेस्ट (टीडीसीएसी)च्या १९व्या एडिशनची घोषणा केली. टोयोटा मोटर कॉर्पोरेशन जपानची संकल्पना असलेला हा प्रमुख जागतिक उपक्रम कल्पनाशक्तीला वाव देतो आणि भावी गतीशीलता नवप्रवर्तकांना प्रेरित करतो. ही स्पर्धा भारतातील १५ वर्षे व त्यापेक्षा कमी वयाच्या मुलांसाठी १२ जानेवारी ते १२ फेब्रुवारी २०२६ पर्यंत खुली असेल, जेथे तरूण विचारवंतांना सर्जनशीलता व कलेच्या क्षमतेच्या माध्यमातून भावी वाहनांची संकल्पना, डिझाइन व चित्र सादर करण्यासाठी व्यासपीठ मिळेल.

### आशिष आयएसपीएलमध्ये पदार्पणासाठी सज्ज

**रायगड :** टेनिस बॉल क्रिकेटच्या वर्तुळात 'आशिष दादा' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या आशिषसाठी, इंडियन स्ट्रीट प्रीमियर लीग (आयएसपीएल) पर्यंतचा प्रवास हा आवड, संयम आणि चिकाटीने घडलेला आहे. १३ नोव्हेंबर १९९१ रोजी मुंबईत जन्मलेला आशिष रायगडचा रहिवासी आहे, जिथे त्याच्या क्रिकेटवरील प्रेमाची सुरुवात अगदी सामान्य पद्धतीने झाली; गल्लीबोळात हाताने टाकलेल्या चेंडूने क्रिकेट खेळण्यापासून, आणि हळूहळू स्वतःपेक्षा मोठ्या व अधिक अनुभवी खेळाडूंविरुद्ध खेळून त्याने स्वतःची क्षमता आजमावली.

### एअरबीएनबी-लोल्लापालूझा भागीदारीतून 'लाईक अ लोकल' मुंबई अनुभव

**छत्रपती संभाजीनगर :** जेनझी प्रवाशांच्या बदलत्या ट्रॅव्हल ट्रेंडला अनुसरून एअरबीएनबीने लोल्लापालूझा इंडिया २०२६च्या निमित्ताने अभिनेता व सांस्कृतिक आयकॉन सिद्धांत चतुर्वेदी यांच्यासोबत रणनीतिक भागीदारी जाहीर केली आहे. 'लोल्ला इंडिया लाईक अ लोकल' या एअरबीएनबी ओरिजिनल एक्सपिरीयन्सअंतर्गत निवडक पाहुण्यांना सिद्धांतच्या मार्गदर्शनाखाली मुंबईतील स्थानिक परिसर, खाद्यसंस्कृती, संगीत आणि सर्जनशील ठिकाणांचा अनुभव घेता येणार आहे. या उपक्रमाचा मुख्य भाग म्हणजे 'द मुंबई गाईडबुक'-सिद्धांत यांनी क्युरेट केलेले डिजिटल सिटी गाईड. हा एक्सक्लुझिव्ह अनुभव १९ जानेवारीपासून बुकिंगसाठी उपलब्ध असून फक्त चार पाहुण्यांसाठी मर्यादित आहे.

### प्रथमच येत आहे पॉ पेट्रोल-फिनिक्स मार्केटसिटीमध्ये

**छत्रपती संभाजीनगर :** जगभरात प्रसिद्ध आणि लहान मुलांमध्ये लोकप्रिय असलेला प्री-स्कूल शो (पी ए डब्ल्यू) पॉ पेट्रोल आता प्रथमच पुण्यात येत आहे. हा खास कार्यक्रम फिनिक्स मार्केटसिटी पुणे येथील लिबर्टी स्क्वेअर येथे ९ जानेवारी ते ८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. यावेळी लिबर्टी स्क्वेअर हे ठिकाण ॲडव्हेंचर बे थीमवर सजवले जाणार आहे. मुले आणि कुटुंब येथे मजेदार आणि इंटरॅक्टिव्ह अनुभवाचा आनंद घेऊ शकतील. हा उपक्रम भारतात जिओस्टारकडून सादर केला जात आहे.

### व्हॅक्यूम टेक्नॉलॉजीमध्ये पुढाकार

**पुणे :** एल्जी इक्विपमेंट्स लिमिटेड (बीएसई: ५२२०७४ । एनएसई: ईएलजीआईइक्विप), जगातील आघाडीच्या एअर कंप्रेसर उत्पादक कंपन्यांपैकी एक, आज आपल्या कोयंबटूर मुख्यालयात नवीन व्हॅक्यूम पंप असेंब्ली लाइनच्या उद्घाटनाची घोषणा केली.ही नवीन सुविधा एल्जी च्या व्हॅक्यूम सोल्युशन्स क्षेत्रातील रणनीतिक विस्ताराचा एक महत्त्वाचा टप्पा आहे आणि मॅन्युफॅक्चरिंग एक्सेलन्स, क्वालिटी लीडरशिप आणि ग्लोबल कॉम्पिटिटिवनेस याबाबत कंपनीची बांधिलकी अधिक मजबूत करते.ही असेंब्ली लाइन एल्जी आणि डी.व्ही.पी. व्हॅक्यूम टेक्नॉलॉजी एस.पी.ए., इटली यांच्यातील मल्टी-ईयर टेक्नॉलॉजी लायसन्सिंग ॲग्रीमेंटवर आधारित आहे.

# मानसिक स्थैर्यासाठी संत तत्त्वज्ञान प्रभावी : डॉ. वक्ते

**तभा वृत्तसेवा,**

**छत्रपती संभाजीनगर, दि. १४ :** विज्ञान केवळ 'कसे?' हा प्रश्न विचारते, तर तत्त्वज्ञान 'का?' याचा शोध घेते. आजच्या धकाधकीच्या जीवनात मानसिक स्थैर्याची नितांत गरज असून, ते मिळवून देण्यासाठी विज्ञानापेक्षा किंवा पारंपरिक तत्त्वज्ञानापेक्षा आपल्याकडील 'संत तत्त्वज्ञान' अधिक प्रभावी ठरू शकते, असे महत्त्वपूर्ण प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू तथा पैठण संतपीठाचे संचालक प्रा. डॉ. प्रवीण वक्ते यांनी केले.

महात्मा गांधी मिशन विद्यापीठ आणि महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ४१ व्या राष्ट्रीय



अधिवेशनाच्या समारोप प्रसंगी ते मुख्य वक्ते म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ होते. डॉ. वक्ते यांनी संत साहित्याच्या अभ्यासावर भर देत पुढे स्पष्ट केले की, संत तत्त्वज्ञानाचे लेखन केवळ सांप्रदायिकांनी न करता ते अभ्यासक आणि तत्त्वज्ञांनी केल्यास, त्या साहित्याला खऱ्या अर्थाने वैचारिक वारसा आणि संशोधनात्मक मूल्य प्राप्त होईल. एमजीएम परिसरात या तीन दिवसीय अधिवेशनाची उत्साहात सांगता झाली. या प्रसंगी महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदेचे नवनिर्वाचित अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. अमन बगाडे यांची निवड जाहीर करण्यात आली. तसेच अधिवेशनातील वक्तृत्व आणि संशोधन निबंध स्पर्धेतील विजेत्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

समारोप सत्रात कुलगुरू डॉ. विलास सपकाळ यांनीही तत्त्वज्ञानाचे समकालीन महत्त्व विषद केले. या कार्यक्रमाचे स्वागत डॉ. सी. एम. राव यांनी केले.

सूत्रसंचालन डॉ. रिहाना सय्यद यांनी केले, तर आभार डॉ. रामेश्वर कणसे यांनी मानले.

# उगम ग्रामीण विकास संस्थेचा ३० वा वर्धापन दिन साजरा होणार

**तभा वृत्तसेवा,**

**उमरा, दि. १४ :** उमरा (ता. कळमनुरी) उगम ग्रामीण विकास संस्था, उमरा यांच्या वतीने संस्थेच्या ३० व्या वर्धापन दिनानिमित्त तृतीय दशक वर्धापन दिन सोहळा दि. १५ जानेवारी २०२६, गुरुवार रोजी सकाळी ११ वाजता उगम ग्रामीण विकास संस्था, उमरा येथे आयोजित करण्यात आला आहे.



मागील तीन दशकांपासून उगम ग्रामीण विकास संस्था हिंगोली जिल्ह्यातील ग्रामीण, आदिवासी व वंचित समाजघटकांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने कार्यरत आहे. पाणी व मृदसंधारण, शेती विकास, आरोग्य, महिला सक्षमीकरण, युवक विकास, उपजीविका, बाल व किशोरवयीन आरोग्य, ग्रामविकास अशा विविध क्षेत्रांत संस्थेने भरीव कार्य केले आहे.

या वर्धापन दिन सोहळ्यानिमित्त माजी सरपंच तथा आदर्श ग्रामपंचायत पाटोदा येथील मार्गदर्शक व्यक्तिमत्त्व भास्करराव पेरे पाटील यांचे विशेष मार्गदर्शन लाभणार आहे. त्यांच्या अनुभवातून ग्रामपंचायत सक्षमीकरण, लोकसहभागातून विकास व आदर्श गाव उभारणी यावर मौलिक विचार मांडले जाणार आहेत.

या महत्त्वाच्या कार्यक्रमास ग्रामस्थ, गावकरी, सरपंच, ग्रामसेवक, ग्रामपंचायत सदस्य, युवक, महिला मंडळे व शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन उगम ग्रामीण विकास संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे. हा सोहळा ग्रामीण विकासाच्या ३० वर्षांच्या प्रवासाचा साक्षीदार ठरणार असून, भविष्यातील विकासाच्या दिशेसाठी मार्गदर्शक ठरणार आहे, असे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले.

# देवगिरी बँक, जवाहर कॉलनी शाखेत सहकार भारती स्थापना दिन

**तभा वृत्तसेवा,**

**छत्रपती संभाजीनगर, दि. १४ :** सहकार क्षेत्रातील मूल्यवृद्धी, संस्थात्मक बळकटीकरण आणि सहकारी चळवळीच्या दीर्घकालीन धोरणात्मक उद्दिष्टांना अधोरेखित करत देवगिरी नागरी सहकारी बँक लिमिटेड, शाखा जवाहर कॉलनी येथे सहकार भारती स्थापना दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

दि. १३ जानेवारी २०२६ रोजी आयोजित या कार्यक्रमात सहकार भारतीच्या संभाजीनगर शहर मंत्री सौ. सुचिता लाहोटी या प्रमुख वक्त्या म्हणून तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माननीय नगर संघचालक अनयजी फणसळकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. दीपप्रज्वलन व भारतमाता पूजनाने कार्यक्रमाची औपचारिक सुरुवात करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन शाखेचे उपव्यवस्थापक सुनील देशमुख यांनी केले. त्यांनी पाहुण्यांचा परिचय करून देत कार्यक्रमाच्या उद्दिष्टांची रूपरेषा मांडली. शाखा व्यवस्थापक सौ. संजीवनी शेजुळ यांनी बँकेस नुकताच प्राप्त झालेला पुरस्कार, तसेच बँकेच्या सातत्यपूर्ण प्रगतीचा वाढता आलेख आणि भविष्यातील कार्यदिशा याबाबत उपस्थितांना



सविस्तर माहिती दिली.

प्रमुख वक्त्यांनी आपल्या मनोगतात सहकार चळवळीचा काल, आज आणि उद्याचा प्रवास, सहकाराची विस्तारित व्याप्ती, तसेच सहकार भारतीच्या स्थापनेमागील धोरणात्मक उद्देश आणि कार्यपद्धती यावर सखोल मार्गदर्शन केले. यावेळी प्रमुख उपस्थितांच्या हस्ते बँकेच्या दिनदर्शिकेचे औपचारिक विमोचन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी शाखेच्या अधिकारी सौ. प्राची वेताळ यांनी आभार प्रदर्शन केले. नेटवर्किंग व चहापानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव नोंदणीस सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**

**छत्रपती संभाजीनगर, दि. १४ :** जगभरातील सर्वोत्कृष्ट चित्रपट मराठवाड्यातील रसिकांपर्यंत पोहोचवणाऱ्या अकराव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची घोषणा करण्यात आलेली असून बुधवार, दि. २८ जानेवारी ते रविवार, दि. ०१ फेब्रुवारी २०२६ या दरम्यान हा महोत्सव आयनॉक्स थिएटर, प्रोझोन मॉल, छत्रपती संभाजीनगर येथे राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवरील कलावंताच्या मांदियाळीत संपन्न होणार आहे. महोत्सवास उपस्थित राहण्यासाठी प्रतिनिधी नोंदणीस शनिवार, दि. १० जानेवारी २०२६ पासून सुरूवात झाली आहे.

**दि. २८ जानेवारी ते १ फेब्रुवारी २०२६ दरम्यान छत्रपती संभाजीनगर येथे आयोजन**

AIFF
AJANTA-ELLORA
INTERNATIONAL FILM FESTIVAL
January 28th to Feb 01st, 2026
Chhatrapati Sambhajinagar
Organized by
MARATHWADA ART CULTURE AND FILM FOUNDATION

नाथ ग्रुप, एमजीएम विद्यापीठ, यशवंतराव चव्हाण सेंटर प्रस्तुत व मराठवाडा आर्ट कल्चर व फिल्म फाउंडेशन आयोजित अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव हा सुचना एवं प्रसारण मंत्रालय, भारत सरकार व सांस्कृतिक कार्य विभागाच्या सहकार्याने संपन्न होत आहे.

जगभरातील सर्वोत्कृष्ट सिनेमे, मास्टर क्लास, परिसंवाद, उदघाटन व समारोप सोहळा छत्रपती संभाजीनगरच्या नागरिकांना अनुभवता येणार आहे. शनिवार, दि. १० जानेवारी २०२६ पासून प्रतिनिधी नोंदणीस सुरूवात झाली आहे. महोत्सवाची वेबसाईटवर जावून चित्रपट रसिकांना प्रतिनिधी नोंदणी करता येईल.

छत्रपती संभाजीनगरचे नाव चित्रपट क्षेत्रात जागतिक व्यासपीठावर नेणाऱ्या या महोत्सवात जास्तीत जास्त संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन महोत्सवाचे संस्थापक व संयोजन समितीचे अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल, प्रमुख मार्गदर्शक अंकुशराव कदम, मानद अध्यक्ष आशुतोष गोवारीकर, सतीश कागलीवाल, महोत्सवाचे संचालक सुनील सुकथनकर, कार्यकारी संचालक चंद्रकांत कुलकर्णी, कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, डॉ.अपर्णा कक्कड, आकाश कागलीवाल, डॉ.आशिष गाडेकर, निमंत्रक नीलेश राऊत, महोत्सवाचे एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर जयप्रद देसाई, ज्ञानेश झोटींग, क्रिएटिव्ह डायरेक्टर डॉ.शिव कदम, डॉ. रेखा शेळके, डॉ. प्रेरणा दळवी, शिवशंकर फाळके, प्रा.दासू वैद्य, डॉ.आनंद निकाळजे, सुबोध जाधव आदींनी केले आहे.

# सोयगाव येथे जिजाऊ जन्मोत्सवनिमित्त विविध स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**

**सोयगाव,दि.१४ जानेवारी :** राष्ट्रमाता जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंती या निमित्ताने जिल्हा परिषद प्रशाला सोयगाव येथे विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. यात वेशभूषा स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धा संपन्न झाल्या विद्यार्थ्यांनी वेशभूषा स्पर्धे त उत्स्फूर्त सहभाग घेतला यात ऐतिहासिक महान स्त्रिया यांच्या जीवन व कार्य याविषयी वेशभूषा करून त्यांच्याविषयी उपस्थितांना माहिती दिली.

यावेळी जिल्हा परिषद प्रशाला सोयगाव येथील इसरो सहल निवड चाचणी केंद्रस्तरीय परीक्षेतून तालुका स्तरावर निवड झालेली विद्यार्थी अक्षरा पंडित, गायत्री बावस्कर, वैष्णवी ढगे, यांचा सत्कार कृषी भूषण अरुण सोहनी व केंद्रप्रमुख फिरोज तडवी, लेनापुरचे मुख्याध्यापक गजानन मख यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी गटशिक्षणाधिकारी यांचे प्रतिनिधी वाघ व सुनील शेटे यांची उपस्थिती होती. वेशभूषा स्पर्धेचे बाह्य परीक्षण शिक्षिका लाड व संगीता सोनवणे यांनी केले. कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक दादाराव राठोड, शिवाजी नवले, सुखदेव पाटील, दौलतसिंग परदेशी, संतोष भारद्वाज, विद्याधर बागुल, संगीता सोनवणे, राजेंद्र उंबरकर, भास्कर चौधरी, तुकाराम पायघन,जया वाघ, वैजनाथ सावळे, सचिन ढगे, शिवराम आगे यांनी परिश्रम घेतले.

# संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या 'रासेयो' शिबिराची सांगता

**तभा वृत्तसेवा,**

**सोयगाव, दि.१४ जानेवारी :** येथील संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि. ७ ते १३ जानेवारी दरम्यान सोयगाव तालुक्यातील माळेगांव पिप्री येथे आयोजित करण्यात आलेल्या सात दिवशीय विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराची सांगता झाली.

शिबिरांतर्गत ग्रामस्वच्छता करण्यात आली, पडीत जमीन विकासासाठी वृक्षारोपण करण्यात आले. जलसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापनासाठी नदीवरील बंधारा दुरुस्त करण्यात आला,महाविद्यालयातील स्वंयसेवकाना स्वामी विवेकानंद यांच्या जीवनपासंबंधी विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. मतदार जागृती करण्यात आली. आरोग्य संबंधी गावकऱ्यांची जाणीवजागृती करून आरोग्य तपासणी करण्यात आली.

याप्रसंगी उत्कृष्ट स्वंयसेवक म्हणून वाल्मीक इंगळे, उत्कृष्ट स्वंयसेविका म्हणून साक्षी दांडगे,उत्कृष्ट डायरी लेखन राहुल इंगळे इत्यादी स्वंयसेवकांचा सत्कार करण्यात आला. या शिबिराचे अहवाल



वाचन कार्यक्रमाधिकारी डॉ. निलेश गावडे यांनी तर सूत्रसंचालन डॉ.सुनील चौधरे यांनी केले. डॉ. पंकज गावित यांनी आभार प्रदर्शन केले.

या शिबीर सांगता कार्यक्रमासाठी डॉ. महेश बाबरेकर, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. रावसाहेब बारोटे, अंतर्गत गुणवत्ता आश्वासन कक्ष समन्वयक डॉ.प्रमोद पवार, पदव्युत्तर समन्वयक डॉ.सी.यु.भोरे, डॉ.रामेश्वर मगर, डॉ. श्रीकृष्ण परिहार, डॉ.मनोज कुमार चोपडे, डॉ.विनोद बारोटे, डॉ.सुशील जावळे, डॉ.पंकज शिंदे, कनिष्ठ विभाग प्रमुख डॉ. उल्हास पाटील, कार्यालय अधीक्षक पंकज साबळे, क्रीडा संचालक डॉ.निलेश गाडेकर, डॉ.साईराज तडवी, प्रा. स्वाती देशमुख, ग्रंथपाल डॉ.निर्मला बोराडे यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी, स्वंयसेवक विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते.

# डॉ. बाबासाहेबांनी पाहिलेले स्वप्न सत्यात उतरवण्याची जबाबदारी शिक्षकांची : प्रा. महालिंगे

**तभा वृत्तसेवा,**

**छत्रपती संभाजीनगर, दि. १३ :** डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मराठवाड्यासारख्या वंचित, अविकसित प्रदेशातील मुलांच्या शिक्षणाचे स्वप्न पाहिले. ते स्वप्न सत्यात उतरण्यासाठी त्यांनी मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली . पुढे त्या महाविद्यालयाच्या परिसरातच सुरुवातीचे काही वर्ष मराठवाडा विद्यापीठाचे तास भरायचे. अनेक लोकांनी त्या काळात विद्यापीठाच्या स्थापनेला विरोध केला पण बाबासाहेबांनी त्या काळापासूनच मराठवाड्यात विद्यापीठ हवे असा आग्रह धरला आणि म्हणून पुढच्या काळात मराठवाडा विद्यापीठ स्थापन झाले. म्हणून या महामानवाचे नाव विद्यापीठाला देणे योग्य आहे असे समजून सर्व जातीधर्मातल्या लोकांनी नामांतरासाठी




संघर्ष केला. नामांतरासाठी शहीद होणारा पहिला तरुण हा मराठा समाजातील होता. या विद्यापीठाच्या स्थापनेमागे डॉ. बाबासाहेबांनी जे स्वप्न पाहिले ते स्वप्न सत्यात उतरवण्याची जबाबदारी आम्हा शिक्षकावर आहे असे प्रतिपादन प्रा. दिलीप महालिंगे यांनी केले. ते आज प्रतिष्ठान महाविद्यालयात संपन्न झालेल्या विद्यापीठ नामविस्तार दिनाच्या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. शिवानंद सोनकांबळे यांनी केला.सूत्रसंचालन डॉ. हंसराज जाधव यांनी तर आभार डॉ. अर्जुन मोरे यांनी मानले. या कार्यक्रमात महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

**जाहीर प्रगटन**

**मा. दिवाणी न्यायधिश साहेब कनिष्ठ स्तर न्यायालय गंगापूर जि. छ. संभाजीनगर**

सिव्हील एम. ए.नं. २५/२०२६,
पु.ता.२५/०२/२०२६
अर्जदार :-१) शोभाबाई प्रकाश मुंजाळ, वय ५२ वर्षे धंदा. शेती), २.नवनाथ प्रकाश मुंजाळ, वय ३२ वर्षे धंदा. शेती, ३) आकाश प्रकाश मुंजाळ, वय २५ वर्षे धंदा. शिक्षण, सर्व रा. खडक नारळा, ता. गंगापूर जि. छ. संभाजीनगर
-: विरूद्ध :-
गैरअर्जदार :- निरंक
प्रकरण:- कलम २ बॉम्बे रेगुलेशन क्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.
ज्याअर्थी अर्जदार यांना त्यांचे वकील श्री.डि.ई. पानकडे यांचे मार्फत कलम २ बॉम्बे रेगयुलेशन क्ट नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे व कथन केला आहे की, अर्जदार नं. १ याचे पति व २ व ३ यांची वडिल नामे श्री. प्रकाश लक्ष्मण मुंजाळ हे दि.०२/०१/२०२३ रोजी मौजे खडक नारळा ता. गंगापूर जि.छ.संभाजीनगर येथे मयत झाले आहे. अर्जदार हे मयत प्रकाश लक्ष्मण मुंजाळ यांचे कायदेशीर वारस असून, अर्जदार यांच्या व्यतिरीक्त इतर दुसरे कोणीही वारस नाही. मयत प्रकाश लक्ष्मण मुंजाळ यांचे वारस प्रमाणपत्राची अर्जदार शासकीय योजनांचा लाभ शासकीय कामासाठी आवश्यकता आहे. मिळविण्याकामी व इतर त्याअर्थी सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, मयत प्रकाश लक्ष्मण मुंजाळ यांचे अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र देण्यास कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप असल्यास त्यांनी सदरील आपला आक्षेप जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात लेखी स्वरूपात दाखल करावा. मुदतीत आक्षेप न आल्यास अर्जदार यांना मयत प्रकाश लक्ष्मण मुंजाळ यांचे वारस असल्याचे वारसप्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीनंतर येणार अक्षेप ग्राहय धरला जाणार नाही करीता सदरील जाहिर प्रगटन कोर्टाच्या सही व शिक्क्यानिशी दिले आहे.

**कनिष्ठ लिपिक, आदेशावरून**
**सहाय्यक अधीक्षक, दिवाणी न्यायालय क स्तर, गंगापूर**

**जाहीर प्रगटन**

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी कार्यालय, गंगापुर, दंड विभाग**

दुरध्वनी क्रमांक - ०२४३३-२१३३६
ईमेल-tahsildargangagmail.com
जा.क्र.२०२६/दं.वि./जन्म-मृ. नोदं/कावी.-२९३
दि.१३/०१/२०२६
वाचा- १. जन्म व मृत्यू नोंदणी सुधारणा अधिनियम- २०२३, २. मा. जिल्हादंडाधिकारी छत्रपती संभाजीनगर यांचेकडील आदेश जा.क्र.२०२५/गृह-४/कावी दि.१७/०७/२५, ३. श्री. राहुल बाळासाहेब काटकर रा.जाखमाथा ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर यांचा अर्ज दिनांक ३१/१२/२०२५
जाहिर प्रगटन : श्री. राहुल बाळासाहेब काटकर रा. जाखमाथा ता. गंगापुर
विषय : जन्म व मृत्यू नोंदणी सुधारणा अधिनियम-२०२३ अर्ज.
ज्यानुसार, अर्जदार श्री. राहुल बाळासाहेब काटकर रा.जाखमाथा ता. गंगापुर यांनी विनंती अर्ज सादर करून कळविले आहे की, त्यांचा मुलगा कैवल्य राहुल काटकर रा. जाखमाथा ता. गंगापुर याचा दि.०८/०२/२०२५ रोजी ओम साई हॉस्पीटल गंगापुर येथे जन्म झाला असून सदर ठिकाणी त्याबाबतची नोंदणी केलेली नसल्यामुळे जन्म-मृत्यू नोंदणी सुधारणा अधिनियम-२०२३ अन्वये अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे. सदर जाहिर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, अर्जदार त्यांचा मुलगा कैवल्य राहुल काटकर रा. जाखमाथा ता. गंगापुर याचा दि. ०८/०२/२०२५ रोजी ओम साई हॉस्पीटल गंगापुर येथे झाला असले त्याबाबत संबंधीताचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आदेश मिळणेस विनंती केली आहे. करीता सदर प्रकरणी जर कुणाचा काही उजर/आक्षेप/हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झालेपासून १५ दिवसाच्या आत उजर/आक्षेप/हरकत मुळ कागदपत्रासह या न्यायालयात नोंदवावा, मुदतीनंतर आलेले कोणतेही उजर / आक्षेप / हरकत ग्राहय धरले जाणार नाहीत व अर्जदाराचे जन्म प्रमाणपत्राबाबत आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर जाहिर प्रगटन माझ्या सही व शिक्यानिशी देण्यात आले.

**दिनांक १३/०१/२०२६. स्थळ : गंगापुर**
**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी गंगापुर.**

## अग्रलेख...

# चीनने नखे काढलीच

व्याप्त काश्मीरच्या मुद्यावर चीनने पुन्हा एकदा भारताची चिंता वाढविणारी भूमिका घेतली आहे. गलवान खोऱ्यातील संघर्षानंतर भविष्यात दोन्ही देशांमध्ये शक्सगम खोऱ्यावरून लष्करी तणाव निर्माण होण्याची चिन्हे आहेत. शक्सगम खोरे व्याप्त काश्मिरातील गिलगिट-हुंझाचा भाग आहे. नैसर्गिकदृष्ट्या अत्यंत मनोहारी असलेला हा भाग लष्करी आणि रणनीतिकदृष्ट्याही महत्त्वाचा आहे. स्वातंत्र्यानंतर गिलगिट एजन्सीचा भाग ब्रिटिशांच्या ताब्यात होता. येथे कार्यरत इंग्रज लष्करी अधिकारी विलियम ब्राऊन हा फितूर झाला आणि त्याने जम्मू-काश्मीर संस्थानचा अत्यंत मोक्यावरील हा प्रदेश पाकिस्तानात विलीन केल्याचे घोषित केले. पहिल्या भारत-पाकिस्तान युद्धात तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या चुकीच्या धोरणांमुळे गिलगिट-बाल्टिस्तान हा प्रदेश शत्रूच्या ताब्यात गेला. स्कार्दू या ठिकाणी काश्मीर संस्थानचे सैनिक तैनात होते; पण हिवाळा असल्याने भारतीय सैनिक त्यांना मदत पोहोचवू शकले नाहीत. परिणामी कारगिलपासून जवळ असलेले हे शहर पाकिस्तानच्या ताब्यात गेले. येथे हवाईतळ उभारण्यात आला. येथे चीनची लढाऊ विमाने तैनात आहेत. पाकिस्तान आणि चीन यांच्यात सीमारेषा नव्हती. २ मार्च १९६३ रोजी दोन्ही देशांमध्ये एक सीमा करार झाला, जो पूर्णपणे अवैध आणि बेकायदेशीर आहे. चीनमधील पेकिंग शहरात पाकिस्तानचे तत्कालीन परराष्ट्र मंत्री झुल्फीकार अली भुट्टो आणि चीनचे परराष्ट्र मंत्री मार्शल चेन यी यांनी २ करारांवर स्वाक्षऱ्या केल्या. या करारांनुसार काश्मीरच्या उत्तरेकडील ५२०० वर्ग किलोमीटर एवढा भूभाग चीनला परस्पर देऊन टाकला. याच भागातून चायना-पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरिडॉर (सीपेक) हा प्रकल्प गेला आहे. या भागात मोठ्या प्रमाणात चीनकडून महामार्ग, रेल्वे मार्ग उभारण्यात आले आहेत. एक महामार्ग तर थेट बलुचिस्तानच्या ग्वादार बंदरापर्यंत पोहोचला आहे. ९ जानेवारीला साप्ताहिक पत्रकार परिषदेत सीपेक मुद्यावर बोलताना परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी १९६३ चा चीन-पाकिस्तान सीमा करार अवैध असून, भारत या कराराला मानत नसल्याचे स्पष्ट केले. एवढेच नव्हे तर सीपेक बेकायदेशीर असून, भारतीय भूभागात प्रकल्प उभारणे कोणत्याही स्थितीत मान्य नाही. शक्सगम खोरे आमच्या जम्मू-काश्मीर आणि लडाख या केंद्रशासित प्रदेशाचा अविभाज्य भाग आहे. आपल्या हिताचे रक्षण करण्यासाठी योग्य ती कारवाई करण्याचे अधिकार भारताला आहे, असे त्यांनी कडक शब्दांत सांगितले. या शक्मगम खोऱ्यावर चीनच्या परराष्ट्र विभागाच्या प्रवक्त्या माओ निंग यांनी हा भाग आमचाच असून, पाकिस्तान आणि चीन या दोन सार्वभौम देशांमध्ये झालेल्या सीमा करारानुसार आमच्या भूभागात पायाभूत सुविधा निर्माण करण्याचा अधिकार असल्याचे सांगितले.

भूतकाळात केलेल्या चुकांचे भावी पिढ्यांना परिणाम भोगावे लागतात, याचे तंतोतंत उदाहरण म्हणजे जम्मू-काश्मीर होय. काश्मीरचे संस्थानिक राजा हरि सिंग यांनी संपूर्ण जम्मू-काश्मीर भारतात विलीन करण्याचा निर्णय घेतला. अशावेळी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वातील काँग्रेस सरकारने देशहित लक्षात घेऊन त्वरित संपूर्ण जम्मू-काश्मीर लष्कर पाठवून ताब्यात घेण्याची आवश्यकता होती. पण, दुर्दैवाने कालापव्यय करीत त्यांनी पाकिस्तानला घुसखोर काश्मिरात पाठविण्याची संधी दिली. भारताकडून ठोस प्रतिसाद मिळत नसल्याचे पाहून ऐन हिवाळ्यात पाकिस्तानने गिलगिट-बाल्टिस्तान आणि काश्मीर खोऱ्यात हजारो घुसखोर आणि सोबत सैनिक घुसविले. महाराजा हरि सिंग यांनी विलीनीकरण दस्तावेजावर स्वाक्षरी केल्यानंतर नेहरू यांनी लष्करी हालचाली सुरू केल्या. पण, तोपर्यंत खूप उशीर झाला होता. कारण, तोपर्यंत लष्करीदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या गिलगिट-बाल्टिस्तान या भूभागावर पाकिस्तानने अवैधरीत्या ताबा मिळविला होता. या प्रदेशाला चीन, अफगाणिस्तान, पाकिस्तानच्या सीमा भिडतात. या भूभागातून भारताला थेट युरोपियन देशांसोबत व्यापार करता आला असता. पण, भविष्याचा थोडाही विचार न करता तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी काश्मीर मुद्यावर बोटचेपे धोरण स्वीकारले. याचे गंभीर परिणाम आज आपण भोगत आहोत. उलट चीनने भविष्याचा विचार करताना तिबेट तर बळकावलाच पण १९६२ मध्ये लडाखमधील अक्साई चीन हा मोठा भूभागही गिळंकृत केला. 'हिंदी-चिनी भाई भाई'च्या घोषणांमध्ये नेहरू आणि त्यांचे पाठीराखे मश्गूल असताना तिकडे चीन काराकोरम महामार्ग उभारण्यासाठी तळमळत होता. १९६१ मध्ये संसदेत अक्साई चीनवर चर्चा सुरू होती. चीनच्या आक्रमक हालचालींमुळे संसद सदस्य चिंता व्यक्त करीत होते. मात्र, पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांना काश्मीरशी काहीच घेणेदेणे नव्हते, हे त्यांच्या भूमिकेवरून दिसून आले : ''अक्साई चीन, जिथे गवताचे एक पातेही उगवत नाही आणि १७ हजार फूट उंचीवरील हे बर्फाळ ठिकाण मानवासाठी राहण्यास योग्य नाही. तसेच हा भाग कुठे आहे हेही आपल्याला माहीत नाही.'' नेहरूंच्या या विधानावर खासदारांनी आश्चर्य व्यक्त केले. देशाचा पंतप्रधान असे विधान कसे काय करू शकतो, असे भाव खासदारांच्या चेहऱ्यावर होते. मात्र, माजी सैनिक असलेले खासदार महावीर त्यागी हे उभे राहिले आणि व्यंग करीत म्हणाले, ''माझ्या डोक्यावर एकही केस उगवत नाही. याचा अर्थ माझे डोके बेकार आहे काय?'' त्यागी यांच्या या वाक्यावर सर्व खासदार एका क्षणासाठी अवाक् झाले; पण दुसऱ्याच क्षणी सभागृहात हास्याचे फवारे उडाले. पण, दुसऱ्याच वर्षी चीनने १९६२ मध्ये चीनने आक्रमण करीत अक्साई चीनसह लडाखचा बराच भूभाग ताब्यात घेतला. चीनबाबत पंडित नेहरू यांची भूमिका किती तकलादू आणि आत्मघातकी ठरणारी होती हे सिद्ध झाले. चीनने अक्साई चीन घेऊन आज ६४ वर्षे उलटली आहेत. भारत आजही अक्साई चीन आपला भूभाग मानत असला तरी या भागावरील चीनची मगरमिठी अधिकच घट्ट झाली आहे. यावर कडी म्हणजे चीनने आता शक्सगम खोऱ्यावरही दावा सांगितला. या खोऱ्यातून सीपेक-२ अंतर्गत चीनने पाकिस्तानला जोडणारा एक महामार्ग उभारला आहे. चीनचे हे कृत्य चिथावणी देणारे तर आहेच; पण आंतरराष्ट्रीय कायदे आणि नियमांचे उल्लंघनही आहे. महामार्ग उभारणीला भारताने विरोध करीत शक्सगम खोरे आमचा अविभाज्य घटक असून चीनचे कृत्य बेकायदेशीर असल्याची भूमिका मांडली. यावर तिळपापड झालेल्या चीनने ''चोर ते चोर अन् वरून शिरजोर'' या उक्तीप्रमाणे हे खोरे आमचेच असल्याचे विधान केले.

तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचे चीनबाबतचे धोरण किती चुकीचे आणि आत्मघातकी होते हे आता सिद्ध होत आहे. नेहरूंना दोष देण्यात काय अर्थ आणि आणखी किती काळ नेहरूंना जबाबदार धरणार, असे आजचे काँग्रेसचे नेते म्हणत असले तरी, पश्चिम आणि पूर्वोत्तर सीमेवर नेहरूंच्याच चुकांमुळे भारताला एकाचवेळी दोन शत्रूंचा सामना करावा लागत आहे, हे विसरता येणार नाही. चीन आणि पाकिस्तान सातत्याने भारताला अडचणीत आणण्याचे प्रयत्न करीत आहेत. एकीकडे सीमेपलीकडून दहशतवादी पाठवून भारताला जखमी करण्याचे काम पाकिस्तान सातत्याने करीत असतो तर दुसरीकडे चीन डोकलाम, गलवानसारख्या कुरापती करीत दबाव आणण्याचा प्रयत्न करीत असतो. व्यापार कराराच्या मुद्यावर आधीच अमेरिकेसोबत तणाव असताना चीनने शक्सगम खोऱ्याचा मुद्दा उपस्थित करीत भारताच्या चिंता वाढविल्या आहेत. पूर्वेकडे बांगलादेशही भारताच्या मुळावर उठला आहे. ज्या देशाला आपण जन्माला घातले, तोच आता आपल्याला वाकुल्या दाखवीत आहे. त्यामुळे भारताला एकाचवेळी पाकिस्तान, चीन आणि बांगलादेश या त्रिकुटाशी सामना करावा लागत आहे. बांगलादेशला ढेकणासारखे चिरडण्यास भारताला थोडाही वेळ लागणार नसला तरी पाकिस्तान-चीन यांचे एकत्रित आव्हान चिंतेत टाकणारे आहे. कारण, शक्सगम खोऱ्याचा संबंध या दोन्ही देशांशी आहे. पण, आज ना उद्या भारताला या आव्हानाचा सामना करावाच लागणार हे मात्र नक्की.

## विशेष

# मोहिनी घालणारे रेल्वेचे पूल

**प्रा. सुखदेव बखळे**

भारतीय रेल्वे २१ व्या शतकातील काही सर्वांत महत्त्वाकांक्षी पायाभूत सुविधा प्रकल्प राबवत आहे. हे प्रकल्प राष्ट्रीय एकता मजबूत करणे, रसद सुधारणे आणि आधुनिक रेल्वे नेटवर्कचा विस्तार करणे या स्वरूपाचे आहेत. कठीण भूभागात बांधलेल्या कौशल्यपूर्ण पुलांपासून मालवाहतूक कॉरिडॉर आणि 'हाय-स्पीड' रेल्वेपर्यंत हे प्रकल्प भारताच्या वाढत्या अभियांत्रिकी क्षमता आणि दीर्घकालीन दृष्टिकोनाचे प्रदर्शन जगासमोर करत आहेत. सर्वांत महत्त्वाच्या प्रकल्पांपैकी एक म्हणजे उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल्वे लिंक (यूएसबीआरएल). हा अंदाजे ४४ हजार कोटी रुपये खर्चून बांधलेला अत्यंत धोरणात्मक आणि राष्ट्रीय महत्त्वाचा प्रकल्प आहे. २७२ किलोमीटर लांबीचा रेल्वे ट्रॅक हिमालयीन प्रदेशातून जातो. या प्रकल्पात जगातील सर्वांत उंच रेल्वे आर्च ब्रीज, चिनाब रेल ब्रीजदेखील समाविष्ट आहे. नदीपासून ३५९ मीटर उंचीवर असलेला हा पूल आयफेल टॉवरपेक्षा उंच आहे. हा १,३१५ मीटर लांबीचा स्टील आर्च ब्रीज भूकंप आणि वाऱ्याच्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी डिझाईन केला आहे. या प्रकल्पात अंजी नदीवरील भारतातील पहिला केबल-स्टेड रेल्वे पूल असून, त्याला 'अंजी रेल ब्रीज' म्हणून ओळखले जाते. त्याचाही समावेश आहे. या प्रकल्पात ३६ बोगदे (११९ किलोमीटर लांबी) आणि ९४३ पूल समाविष्ट आहेत. 'यूएसबीआरएल' काश्मीर खोऱ्याला सर्व हवामान रेल्वे कनेक्टिव्हिटी प्रदान करते. यामुळे या प्रदेशात वाहतूक, पर्यटन आणि आर्थिक क्रियाकलाप वाढत आहेत.

तामिळनाडूमधील नवीन पंबन रेल्वे पूल हा भारतातील पहिला व्हर्टिकल समुद्री पूल आहे. अंदाजे ५५० कोटी रुपये खर्चून बांधलेला, २.०८ किलोमीटर लांबीचा हा पूल १०० स्पॅनचा आहे. त्यात १८.३ मीटरचे ९९ स्पॅन आणि ७२.५ मीटरचा मुख्य स्पॅन समाविष्ट आहे. या पुलात ३३३ पाईल्स आणि १०१ पाईल्स कॅप्स असलेली एक मजबूत 'सबस्ट्रक्चर सिस्टिम' आहे, जी स्ट्रक्चरल स्थिरता प्रदान करते. त्यात कार्यक्षम भार वितरणासाठी डिझाईन केलेले ९९ 'ॲप्रोच गर्डर्स'देखील समाविष्ट आहेत. हा पूल आव्हानात्मक समुद्री परिस्थिती आणि तीव्र किनारी वाऱ्यांना तोंड देण्यासाठी सक्षम आहे. त्याचे आयुष्य वाढवण्यासाठी, एक गंज संरक्षण प्रणाली प्रदान करण्यात आली आहे. ती पुलाचे सेवा आयुष्य देखभालीशिवाय ३८ वर्षांपर्यंत आणि कमीत कमी देखभालीसह ५८ वर्षांपर्यंत वाढवू शकते. हा नवीन पूल एक महत्त्वाचे तीर्थक्षेत्र आणि पर्यटनस्थळ असलेल्या रामेश्वरमला रेल्वे कनेक्टिव्हिटी सुनिश्चित करतो. त्याच्या प्रगत डिझाईन आणि अभियांत्रिकीची दखल घेऊन नवीन पंबन रेल्वे पुलाला पूल डिझाईन श्रेणीमध्ये प्रतिष्ठित स्टील स्ट्रक्चर्स आणि मेटल बिल्डिंग्ज पुरस्कार २०२४ प्रदान करण्यात आला आहे.

भारतीय रेल्वेने ईशान्येकडील राज्यांमध्येदेखील लक्षणीय प्रगती केली आहे. अनेक वर्षांपासून या प्रदेशाला गंभीर कनेक्टिव्हिटी आव्हानांचा सामना करावा लागला. २०१४ पासून ईशान्येकडे १,६७९ किलोमीटरहून अधिक रेल्वे ट्रॅक टाकण्यात आला आहे. २,५०० किलोमीटरहून अधिक मार्गाचे विद्युतीकरण करण्यात आले आहे. ४७० हून अधिक रोड ओव्हरब्रिज आणि अंडरब्रिज बांधण्यात आले आहेत. बैराबी-सैरंग नवीन लाईन पूर्णपणे कार्यान्वित झाली आहे. ती पहिल्यांदाच आयझॉलला रेल्वे नेटवर्कशी जोडते. आयझॉल आता ईशान्येकडील चौथी राजधानी आहे. ती राष्ट्रीय रेल्वे नेटवर्कशी जोडलेली आहे. 'अमृत भारत स्टेशन योजने'अंतर्गत ईशान्येकडील ६० स्थानकांचा पुनर्विकास केला जात आहे. शिवोक-रंगपो, दिमापूर-कोहिमा आणि जिरीबाम-इम्फाळसारखे मोठे प्रकल्पदेखील वेगाने प्रगती करत आहेत. हे प्रकल्प ईशान्येकडील देशाच्या उर्वरित भागाशी आर्थिक आणि सामाजिक एकात्मतेत योगदान देत आहेत. लुधियाना ते सोननगरपर्यंत पसरलेला 'इस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर' (ईडीएफसी) १,३३७ किलोमीटर लांब आणि पूर्णपणे कार्यरत आहे. जवाहरलाल नेहरू पोर्ट टर्मिनल ते दादरी यांना जोडणारा 'वेस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर' १,५०६ किलोमीटर लांबीचा आहे. त्यापैकी १,४०४ किलोमीटर किंवा ९३.२ टक्के पूर्ण झाले आहे. दोन्ही कॉरिडॉर एकत्रितपणे २,८४३ किलोमीटर लांबीचे आहेत. आजपर्यंत २,७४१ किलोमीटरचे काम सुरू झाले आहे. ते एकूण लांबीच्या अंदाजे ९६.४ टक्क्यांपर्यंत आहे. हे समर्पित कॉरिडॉर प्रवासी मार्गांवरील गर्दी लक्षणीयरीत्या कमी करत आहेत, प्रवासाचा वेळ, लॉजिस्टिक्स खर्च कमी करत आहेत आणि उद्योग आणि बंदरांसाठी विश्वासार्हता सुधारत आहेत. हे समर्पित कॉरिडॉर भारतातील मालवाहतूक बळकट करत आहेत आणि जलद आर्थिक वाढीला चालना देत आहेत. समर्पित मालवाहतूक कॉरिडॉर भारतीय रेल्वे 'हाय-स्पीड रेल्वे'च्या क्षेत्रातही प्रगती करत आहे. मुंबई-अहमदाबाद हाय-स्पीड रेल्वे प्रकल्प 'एनएचएसआरसीएल'द्वारे राबवला जात आहे. २१ डिसेंबर २०२५ पर्यंत एकूण ५०८ किलोमीटर ट्रॅकपैकी ३३१ किलोमीटर व्हायडक्टचे काम पूर्ण झाले आहे. ४१० किलोमीटरसाठी पिअरचे काम पूर्ण झाले आहे. १७ नदी पूल, पाच पीएससी पूल आणि ११ स्टील पूल आधीच पूर्ण झाले आहेत. सुमारे २७२ किलोमीटर आरसी ट्रॅक बेड बांधण्यात आला आहे. ४,१०० हून अधिक 'ओएचई' मास्ट बसवण्यात आले आहेत.

महाराष्ट्रात मोठ्या बोगद्याचे बांधकाम सुरू आहे. सुरत आणि अहमदाबादमध्ये रोलिंग स्टॉक डेपोदेखील विकसित केले जात आहेत. या प्रकल्पामुळे भारतात जागतिक दर्जाचे 'हाय-स्पीड' रेल्वे तंत्रज्ञान येईल. यामुळे दोन प्रमुख आर्थिक केंद्रांमधील प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या कमी होईल. मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पांतर्गत सुरत जिल्ह्यात बांधलेला एक व्हायडक्ट असाच दखलपात्र आहे. पहिल्या वंदे भारत स्लीपर ट्रेनचे आगमन, २०२७ पर्यंत प्रस्तावित बुलेट ट्रेन प्रकल्प आणि काश्मीर आणि मिझोरामच्या दुर्गम भागात रेल्वे मार्गांचा विस्तार हे सर्व सूचित करतात की भारतीय रेल्वे केवळ वाहतुकीचे नाही तर बदलाचे वाहनदेखील बनले आहे. ते नवीन सीमांवर स्वतःची पुनर्परिभाषा करत आहे. गेल्या वर्षीच ते काश्मीर खोरे आणि मिझोरमची राजधानी आयझॉलला जोडले, जे देशाच्या उत्तर आणि पूर्व सीमांना उर्वरित भारताशी जोडते. देशातील पहिला उभ्या-लिफ्ट रेल्वे समुद्री पूल, पंबन पुलापर्यंतदेखील पोहोचले, जे पाल्क सामुद्रधुनीपर्यंत पसरते आणि दक्षिणेकडील रामेश्वरमला मुख्य भारतीय भूमीशी जोडते.

पश्चिमेकडे पहिली ट्रेन पश्चिम समर्पित फ्रेट कॉरिडॉरवर वैतरणा ते जवाहरलाल नेहरू बंदरापर्यंत टाकलेल्या १०२ किलोमीटरच्या नवीन ट्रॅकवर धावली. तथापि, या यशांच्या समांतर, वाहतूक व्यवस्थापन आणि मालवाहतुकीची सर्वांत मोठी परीक्षा आहे. क्षमता वाढवण्यासाठी अमृत भारत स्थानक योजनेअंतर्गत स्थानकांचा पुनर्विकास सुरू आहे; परंतु तो लक्ष्यांपेक्षा मागे आहे. 'कवच'सारख्या सुरक्षा व्यवस्था अजूनही पूर्ण व्याप्तीपासून दूर आहेत. शिवाय, मालवाहतूक हा भारतीय रेल्वेचा कणा आहे, जो त्याच्या एकूण महसुलाच्या ६५ टक्के आहे. तथापि, वस्तुस्थिती अशी आहे की, मालवाहतुकीमध्ये रेल्वेचा वाटा सध्या रस्ते वाहतुकीच्या तुलनेत फक्त २७ टक्के आहे. तो वाढवणे आवश्यक आहे. तथापि, रेल्वे एक हरित वाहतूक व्यवस्था म्हणून आशेचा किरण देते. कारण ती वाहतूक उत्सर्जनात फक्त एक टक्का योगदान देते. भारतीय रेल्वे अशा टप्प्यावर उभी आहे, जिथे यश आणि आव्हाने एकत्र येतात. बुलेट ट्रेनच्या स्वप्नाच्या जवळ जाणे आणि दुर्गम भागात रेल्वेचा विस्तार करणे नवीन सीमा उघडतात; परंतु वाढत्या वाहतुकीचा भार आणि मालवाहतुकीच्या गुंतागुंतीमुळे धोरणकर्त्यांकडून दृष्टी आणि शाश्वत गुंतवणुकीचीदेखील आवश्यकता असते. वेग संतुलित असेल, तंत्रज्ञानाचा समावेश असेल आणि सुरक्षिततेसह विस्तार सुनिश्चित केला गेला, तर भारतीय रेल्वे निःसंशयपणे जागतिक स्तरावर एक विश्वासार्ह मॉडेल म्हणून उदयास येईल.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**गिरीश शेरेकर**

# अमरावती मनपाचा किंगमेकर कोण?

अमरावती महापालिकेच्या २२ प्रभागांच्या ८७ जागांसाठी गुरुवार १५ जानेवारीला मतदान होणार आहे. त्यासाठीचा जाहीर प्रचार मंगळवारी थांबला. या निवडणुकीत सुरुवातीला युती व आघाडीच्या चर्चा झाल्या. शेवटपर्यंत चर्चांच्या फेऱ्या सुरू होत्या. अखेर सर्वच प्रमुख राजकीय पक्षांनी स्वबळावर निवडणूक लढविण्याचा निर्णय घेऊन प्रचार सुरू केला. पक्ष व अपक्ष असे एकूण ६६१ उमेदवार रिंगणात आहेत. दहा दिवस जोरदार प्रचार झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्यापासून भाजपाचे अनेक मंत्री, नेते तसेच इतर पक्षांचे नेतेही प्रचारात सहभागी झाले होते. आरोप-प्रत्यारोप झाले. आता नेमकी वेळ जवळ आली आहे. अमरावती महापालिका हद्दीतल्या मतदारांच्या मनात काय आहे, हे निकालानंतरच स्पष्ट होणार असले तरी अनेक अंदाज वर्तविले जात आहेत. या निवडणुकीचे वैशिष्ट्य म्हणजे प्रभागनिहाय वेगवेगळी समीकरणे पाहायला मिळत आहेत. ज्याला जे समजते ते भाकीत सांगितले जात असून नेमका अंदाज काढणे अवघड झाले आहे.

अमरावतीत त्रिशंकू स्थितीची शक्यता वर्तविली जात आहे. अशा स्थितीत महापालिकेचा किंगमेकर कोण होईल? या प्रश्नाचे उत्तर शोधायचे असेल तर गेल्या १५ दिवसांत तयार झालेल्या समीकरणात ते दडले आहे. भाजपाने २०१७ मध्ये स्वबळावर सत्ता स्थापन केली होती. यंदाही भाजपाची सत्ता स्थापन व्हावी म्हणून संपूर्ण ताकद पणाला लावण्यात आली आहे. पण, पहिले शिवसेना आणि नंतर युवा स्वाभिमान पार्टीसोबत भाजपाचा युतीचा घोळ शेवटपर्यंत कायम राहिल्याने उमेदवार निश्चितीवर काही प्रभागांत परिणाम झाला. शेवटी भाजपाने युवा स्वाभिमानसाठी ज्या प्रभागांत जागा सोडल्या होत्या, तेथे अपक्षांना पाठिंबा देऊन युती संपुष्टात आणली. प्रचारा दरम्यानही भाजपा व युवा स्वाभिमान पार्टीच्या नेत्यांचे शीतयुद्ध चांगलेच रंगले. या दोन्ही पक्षांचा दुवा असलेल्या भाजपा नेत्या नवनीत राणा यांच्या विलासनगर - मोरबाग प्रभागातल्या कृतीची दखल भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांनी सुद्धा घेतली. स्थानिक भाजपा नेत्यांच्या तर ती खूपच जिव्हारी लागली. तेथून वातावरण तापले आणि संभ्रम निर्माण झाला. याचा फटका किती प्रमाणात कोणाला बसेल हे वेळच सांगणार आहे. कोणी कोणाला अंधारात ठेवले माहिती नाही पण, दगाफटका झाला आहे. चार ते पाच प्रभागांत भाजपा व युवा स्वाभिमान पार्टीच्या उमेदवारांतच लढत होत असल्याचे चित्र आहे. भाजपाकडून ते बदलविण्याचे आणि स्वाभिमानकडून ते तसेच कायम ठेवण्याचे प्रयत्न जोरात सुरू आहे. कोणाला यश मिळते, हे निकालातून कळेलच! या स्थितीत जर युवा स्वाभिमानला ८ ते १० जागा मिळाल्या तर ते किंगमेकर होण्याची शक्यता दिसत असून भाजपाची घोडदौड ३० ते ३५ जागांवर थांबू शकते. आमदार रवी राणा यांनाही असे वाटत असेल की भाजपा आपल्यावर अवलंबून राहावी. पण, भाजपाला ते नको आहे. राजकीय स्वार्थ म्हणून दोघेही आपल्या जागेवर बरोबर आहे. तसे पाहिले तर राणा 'कलाकार' आहेत. निकाल जर त्यांच्या मनासारखा आला तर ते सर्वांच्या कल्पनेच्या पलीकडे जाऊन अनेकांना धक्का देणारा निर्णय घेऊ शकतात. यासाठी त्यांना नवनीत राणा यांचे बळ मिळेल. वेळ आल्यावर सर्व काही स्पष्ट होईलच.

एक दुसरी स्थिती राष्ट्रवादी अजित पवार पक्षाची आहे. या पक्षाच्या १० ते १२ जागा येण्याची शक्यता आहे. राज्यात भाजपासोबत हा पक्ष आहे. भाजपातला स्थानिक नेत्यांचा निर्णय प्रक्रियेतला जो गट आहे, त्यांना निकालानंतर जर काही वेगळी स्थिती निर्माण झालीच तर युवा स्वाभिमानपेक्षा राष्ट्रवादीसोबत जाणे आवडणारे आहे. (एका अर्थाने त्यांना राणापेक्षा खोडके किंगमेकर झाले तर चालते) वर म्हटल्याप्रमाणे रवी राणा यांनी धक्कातंत्राचा वापर केला तर? फार विचार करण्याची गरजच उरत नाही. एक तिसरी स्थिती म्हणजे पाच ते सहा जागा मिळाल्या तर शिवसेना एक पर्याय भाजपाकडे आहेच. हा पर्यायही तसा सोईचाच आहे. राजकारणात काहीपण होऊ शकते. कोणाला किती जागा मिळतात, यावरच गणित आहे. राष्ट्रवादी, शिवसेना आणि युवा स्वाभिमानची डोकेदुखी नकोच, आपले स्वतंत्रच बरे असे भाजपाला मनोमन वाटते. त्यासाठीच भाजपाने इतक्या गोट्या फिरवल्या पण तसे होईल का? दुसऱ्या बाजूने काँग्रेस स्वतंत्रपणे किल्ला लढवत आहे. गत निवडणुकी इतक्या जागा कायम ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. त्यांच्या मुस्लिमबहुल भागातल्या उमेदवारांपुढे अन्य पक्षांचे तगडे आव्हान आहे. उबाठा व अन्य छोट्या पक्षाने उमेदवार दिले आहेत. त्यांचेही प्रयत्न सुरू आहेत. मविआपेक्षा युतीचीच सत्ता बसण्याचा अंदाज अनेकांकडून वर्तविला जात आहे. फक्त समीकरण कसे तयार होते, हेच पाहायचे आहे.

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

# ब्रह्म पुराण

**प्रा. दिलीप जोशी**

अठरा पुराणांतील अत्यंत गोड असलेले पुराण म्हणजे ब्रह्म पुराण. भगवान विष्णूंच्या परब्रह्म स्वरूपाचे ज्यात वर्णन आहे म्हणून ते ब्रह्म पुराण. भगवंताच्या दशावताराचेही संक्षेपात वर्णन या पुराणात आहे. याशिवाय भारत देशाचे माहात्म्य, सूर्यादी ग्रहमंडलाची स्थिती इत्यादी वर्णन यात आहे. भगवान श्रीकृष्णाचे विस्तृत चरित्र या पुराणात आहे.

पुराण आणि दशावतार यांची आपण सांगड घालत असल्याने याच पुराणात दशावतार संक्षेपात असले तरीही पुढील भगवान परशुराम अवताराबद्दल आपण चर्चा करणार आहोत.

भगवान परशुराम अवतार म्हणजे ब्रह्मतेज आणि क्षात्रतेज यांचा अनोखा संगम आहे. साधूंचे रक्षण आणि दुष्टांचा विनाश हा भगवंताचा अवतार उद्देश या परशुराम अवतारात ठळक दिसतो. जमदग्नी महामुनी आणि रेणुकामाता यांच्या पोटी आलेला हा बालक म्हणजे


**अग्रतः चतुरो वेदाः पृष्ठतः सशरं धनुः ।**
**इदं ब्राह्मं इदं क्षात्रं शापादपि शरादपि ॥**

चार वेदांचे ज्ञानी म्हणून ब्रह्मतेजस्वी आणि धनुर्धारीमध्ये अग्रणी म्हणून क्षात्रतेजस्वी असे त्यांचे वर्णन केले आहे.

वडील जमदग्नींच्या आज्ञेचे पालन म्हणून आईचे मस्तक उडविले आणि प्रसन्न झालेल्या वडिलांकडून पुन्हा माता रेणुकेला जीवन मिळवून देणारा मातृ-पितृभक्त म्हणजे भगवान परशुराम.

आपल्या वडिलांना म्हणजे ऋषी जमदग्नी यांना मिळालेली कामधेनू कार्तवीर्य अर्जुन पळवून नेतो आहे म्हणून त्या सहस्रार्जुनाचा वध करून आश्रमातील ऋषींना अभय देणारे महापराक्रमी परशुराम अवतार आहेत.

भगवान परशुराम साधनेसाठी गेलेत हे पाहून सहस्रार्जुनाच्या मुलांनी जमदग्नींच्या आश्रमावर हल्ला करून जमदग्नींना ठार मारले. हे ऐकताच पृथ्वीवरील दुष्टांचे निर्दालन करण्यासाठी ज्यांनी कार्तवीर्य अर्जुनाच्या मुलांसह २१ वेळा पृथ्वीवरील दुष्टांचा निःपात केला ते क्षात्रतेजस्वी भगवान परशुराम आहेत.



या हत्येचे पातक फेडण्यासाठी यज्ञ करून यज्ञाचे आचार्य कश्यप ऋषींना संपूर्ण पृथ्वी दान करून ज्यांनी महेंद्र पर्वतावर साधना सुरू केली ते महायोगी भगवान परशुराम. संपूर्ण पृथ्वी दान केल्यामुळे स्वतःला जागा हवी म्हणून आपल्या परशूने ज्यांनी आपल्या सामर्थ्याने समुद्राला मागे हटवून परशुराम क्षेत्र म्हणजे केरळ, कोकण, गोवा किनारपट्टी निर्माण केली ते सामर्थ्यवान भगवान परशुराम आहेत.

ज्यांना स्वयं भगवान शंकराने परशू दिला म्हणून ते परशुराम झालेत. त्यांचे शिष्य देखील भीष्माचार्य, द्रोणाचार्य, कर्ण आणि रुख्मीसारखे एक एकाचेनी मनोव्यापारे, अवघे विश्व संहारे असे होते.

जे चिरंजीव असल्यामुळे चारही युगात कार्यरत होते आणि आहेत. कृत युगात ज्यांच्या परशू प्रहाराने भगवान गणेशाचा एक दात खुडला त्यामुळे गणपती एकदंत झाले. त्रेता युगात ज्यांच्या धनुष्यभंगामुळे श्रीराम-जानकी विवाह झाला. द्वापार युगात भीष्म-द्रोणादींना शिष्यत्व दिले, भगवान श्रीकृष्णाला साहाय्यभूत झालेत आणि कलियुगात आजही ज्यांचे अस्तित्व जाणवते ते भगवान परशुराम आहेत. त्यांची कथा या ब्रह्म पुराणात आहे.

याशिवाय ब्रह्म पुराणात राजा पृथुची कथा, चौदा मन्वंतरे, वैवस्वत मनुंचे वंशज, सगर राजाचे चरित्र दिले आहे.

जंबुद्वीपासह विविध सहा द्वीपांचे वर्णन, भारत वर्षाचे वर्णन दिले आहे. भगवान सूर्यनारायणाचे माहात्म्य आणि त्यांची नावे दिली आहेत. माता पार्वतीची तपश्चर्या, स्वयंवर आणि भगवान महादेवाशी विवाह, दक्ष यज्ञ विध्वंस.

मार्कंडेय चरित्र, विविध तीर्थ वर्णन या पुराणात आहेत. अनंत वासुदेव माहात्म्य, कण्डूमुनींचे चरित्र दिले आहे. अध्याय ७२ ते ८४ पर्यंत भगवान श्रीकृष्ण चरित्र दिले आहे.

यमलोक, यमद्वार, नरक इत्यादींबाबत माहिती या पुराणात आहे.

धर्मकार्य, अधर्म, अन्नदानाचे महत्त्व, गृहस्थाश्रमाचे धन्यत्व, वर्ण आणि आश्रम व्यवस्था, एकादशी माहात्म्य, नैमित्तिक आणि प्राकृतिक प्रलय वर्णन, त्रिविध तापाचे वर्णन, अध्यात्म-ज्ञान-विज्ञान, योग, क्षर आणि अक्षरयोग याच पुराणात दिला आहे. देवी पार्वतीचे अद्‌भुत चरित्र, गौतमी, गंगा तथा गोदावरी स्नानाचे महत्त्व या पुराणात दिले आहे.

गृहस्थाश्रमाचे श्रेष्ठत्व देताना हे पुराण सांगते-

**आश्रमाणि च चत्वारि कर्मद्वाराणि मानदः ।**
**चतुर्णामाश्रमाणाम् च गार्हस्थ्यं पुण्यदम् स्मृतम् ।**

सामाजिक समरसता आपल्या संस्कृतीचा अविभाज्य भाग होता. वर्ण जन्माने नाही तर कर्माने ठरत असे.

**सर्वोऽयं ब्राह्मणो लोके वृत्तेन तु विधीयते ॥**
**वृत्ते स्थितश्च शूद्रोऽपि ब्राह्मणत्वं च गच्छति ।**

गुणवान व्यक्ती जन्माने शूद्र असेल तरीही तिची गणना ब्राह्मण म्हणून होत असे.

कन्या, पुत्र, पृथ्वी, गाय विक्रीला निर्बंध असल्याचेही इथे दिले आहे. त्याला नरक प्राप्ती सांगितली आहे.

**कन्यापुत्रमहीबाजिगवां विक्रयकारिणः ।**
**नरकांत निवर्तन्ते यावदाभूतसंप्लवम ॥**

अतिथीचे स्वागत, आदरातिथ्य आपल्या संस्कृतीचा भाग होता.

**अभ्यागतमनु श्रान्तम् सूर्योढं गृहमागतं ।**
**तं विद्याद्देवरूपेण सर्वक्रतुफलो ह्यसो ।**

थोडक्यात, ब्रह्म पुराणातील परशुराम अवतार ब्रह्मतेज आणि क्षात्रतेजाचा समन्वय होता. त्यामुळेच या भूमीला देवभूमी म्हणत असत. आज मात्र दुर्दैवाने ब्रह्मतेज आणि क्षात्रतेज यांच्यातला समन्वय नष्ट करण्याचा प्रयत्न होत आहे. म्हणूनच आपली पुराणे आपला इतिहास असून त्याचा अभ्यास करणे आणि त्याचे अनुसरण म्हणजे भारतीयत्वाची दृढ स्थापना होय.

९८२२२६२७३५

## तिळगूळ घ्या... गोड गोड बोला...

भारतीय संस्कृतीत सणांना अतिशय महत्त्व आहे. प्रत्येक सण विशिष्ट असा संदेश देत असतो. या सणातून एक वेगळीच प्रेरणा मिळत असते. मकरसंक्रांत हा त्यापैकीच एक सण. मकरसंक्रांत हा वर्षातील पहिला सण त्यामुळे या सणाचा उत्साह काही निराळाच असतो. हा सण संपूर्ण देशात वेगवेगळ्या नावाने आणि वेगवेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो. महाराष्ट्रात तर या सणाला खूप महत्त्व आहे. मकरसंक्रांत म्हणजे सूर्याने मकर राशीत प्रवेश करणे. संक्रांत ऐन थंडीत येते त्यामुळे हवेत गारवा असतो. त्याचा परिणाम आपल्या प्रकृतीवर होतो. त्यामुळे या दिवसात शरीराला उष्ण ठेवण्यासाठी उष्ण पदार्थ खाल्ले जातात. तिळ आणि गूळ यात उष्मांक अधिक प्रमाणात असतो. कदाचित त्यामुळेच मकरसंक्रांतीच्या दिवशी तिळगूळ वाटला जातो. तिळगूळ देताना ''तिळगूळ घ्या गोड गोड बोला'' असा संदेशही दिला जातो. एकमेकांविषयी स्निग्धता देणारे तिळ आणि गोडवा देणारा गूळ एकत्र आल्याने प्रेमाचे नाते टिकते असे



प्रतीकात्मक रूपही या सणाला आहे. मकरसंक्रांतीला विवाहित स्त्रिया एकमेकांना हळदी-कुंकू लावून सौभाग्याचे वाण देतात. हे सर्व करण्यामागे कोणतीही रूढी परंपरा नसून नव्याने स्वागत आणि त्यातून आनंद घेणे हा आहे. पूर्वी स्त्रियांना एकत्र येण्याची संधी क्वचितच मिळत असे. या सणानिमित्त महिला एकत्र येत असे. आजच्या धकाधकीच्या जीवनातही महिलांना एकत्र येण्याची संधी क्वचितच मिळते त्यामुळे संक्रांतीनिमित्त मिळणारी ही आयती संधी महिलावर्ग सोडत नाहीत. या दिवशी पतंग उडवण्याची परंपरा आहे. अनेक गावांत पतंगोत्सव आयोजित केला जातो. या दिवशी आकाशात विविध रंगांची, आकाराची पतंगे उडताना दिसतात. एकमेकांशी असलेली कटुता विसरून प्रेमाने वागा असा संदेश देणारी मकरसंक्रांत म्हणजे आनंदाची पर्वणीच. मकरसंक्रांतीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

## वाचक पत्रे

## वाण देणे प्रदेशानुसार भिन्नता पण भावना एकच

मकरसंक्रांती हा दान, कृतज्ञता आणि सामूहिक आनंदाचा सण आहे. वाण देणे ही त्यातील महत्त्वाची धार्मिक परंपरा आहे. शास्त्रानुसार संक्रांतीच्या काळात यथाशक्ती दान देणे पुण्यकारक मानले जाते. संक्रांतीनिमित्त सुवासिनी हळदी-कुंकू



दान देतात, त्याला वाण म्हणतात. हळदी-कुंकवाचे वाण देणे ही प्रथा असून वाणातील वस्तू सात्त्विक व अध्यात्मपूरक असाव्यात.

याच परंपरेत सुगड्याचे वाण विशेष महत्त्वाचे आहे. 'सुगड' हा 'सुघट' या शब्दाचा अपभ्रंश असून मातीच्या या छोट्या घटांत शेतातील नवे धान्य, कडधान्ये, तिळगूळ, कापूस, बोर, भाजीपाला भरून त्यांची पूजा केली जाते. शेतशिवारातील समृद्धी सर्वांना मिळावी, त्यातील आनंद सगळ्यांना अनुभवता यावा हा त्यामागील भाव आहे. प्रदेशानुसार या प्रथेत भिन्नता आढळते. महाराष्ट्रात सुगडे मातीच्या झाकणाने झाकून देतात, कोकणात काळ्या सुगड्यावर लाल सुगड पालथे ठेवून पूजन करतात, अन्यत्र काळे मोठे सुगड खाली त्यावर लाल सुगड ठेवून दोन्हीत वाण भरतात, गोव्यात सुगड पूजन करतात त्या घटात वेगवेगळ्या प्रकारची कडधान्ये, हिरव्या काचेच्या बांगड्या, हळद-कुंकू आणि सौभाग्याचं वाण ठेवून त्याची पूजा केली जाते आणि पूजा सांगायला आलेल्या ब्राह्मणाला हा घट दान केला जातो. कर्नाटक व आंध्र प्रदेशात एल्लू-बेल्ला (तिळ-गूळ, नारळ, शेंगदाणे) दिले जाते; तामिळनाडूमध्ये पोंगल साजरा होतो; गुजरातमध्ये पतंगोत्सव सोबत तिळगूळ, चिवडा आणि मिठाईचे आदानप्रदान केले जाते. सर्व ठिकाणच्या विविधतेतून एकच संदेश मिळतो, तो म्हणजे ईश्वरकृपेचे आदानप्रदान आणि प्रेम भाव वाढवणे.

**प्रांजली विजय ब्रह्मे**/ नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# औशाची जनता विकासाबरोबर जाईल : आ. पवार

## विरोधकांचे जाती पातीचे राजकारण मतदारानी धुडकावून लावण्याचे आवाहन

**त.भा. वृत्तसेवा,**

**औसा, १४ जानेवारी :** औसा शहराचा चेहरा मोहरा बदलण्याचा निर्धार करत गेल्या सहा वर्षांपासून मी सातत्याने विकास कामे केली आहेत. जात-पात, धर्म या गोष्टी बाजूला ठेवून जनता विकासाबरोबर उभी राहील, असा विश्र्वास भाजप आ. अभिमन्यू पवार यांनी सोमवारी (दि. २४) प्रभाग दहा मधील महायुतीच्या प्रचार सभेत व्यक्त केला. औसा नगरपालिकेला क वर्गातील राज्यातील आदर्श नगरपालिका बनवायचे असेल तर विकासाचा ध्यास असलेल्या उमेदवारांना संधी देणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. सभेला सेनेचे जिल्हाप्रमुख शिवाजी माने, माजी नगराध्यक्ष किरण उटगे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शेखर सोनवणे, शिवरुद्र मुर्गे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना पवार म्हणाले की, औसा शहराचा सर्वांगीण व समतोल



विकास साधण्यासाठी मी कधीही जात किंवा धर्म पाहून निधी दिला नाही. ज्याला गरज आहे त्या भागाला प्राधान्य देत कामे केली. पण विरोधकांना लोकांसमोर विकास दाखविण्यासारखे काही नाही म्हणून ते जातीयतेचा आधार घेऊन मतदारांची दिशाभूल करत आहेत. नगराध्यक्ष पद ओबीसी महिलेला राखीव असतानाही हे पद घरात ठेवण्याचा राष्ट्रवादीचा प्रयत्न हा ओबीसी समाजाचा अपमानच आहे. गेल्या अनेक वर्षांत पालिकेत भ्रष्टाचार, बोगस कामे आणि निधीचा दुरुपयोग झाला असून आम्ही सुरू केलेल्या विकास कामांना विरोधकांनी छुप्या पद्धतीने अडथळे निर्माण केले.

औसा शहरातील महत्त्वाच्या विकासकामांची माहिती देताना पवारांनी बेलकुंड येथे २४७ हेक्टरवरील एमआयडीसी उभारणी, नवीन बसस्थानक प्रकल्प, माकणी-औसा ५५ कोटींची पाणीपुरवठा योजना, शहरातील सर्व कच्च्या रस्त्यांचे सिमेंट रस्त्यांमध्ये रूपांतर, ४५ कोटींची वाढीव पाणीपुरवठा योजना आणि नवीन पाईपलाइन यांचा उल्लेख केला.

शहराच्या सुरक्षेसाठी मुंबईतील मलबार हिलप्रमाणे सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले असून शहरात आधुनिक, पाच मजली उपजिल्हा रुग्णालय उभारण्यात आले आहे. धार्मिक बांधकामांबाबतही त्यांनी सांगितले की, मुस्लिम समाजातील दर्गे, मशीद व धार्मिक स्थळांच्या विकासासाठी १७ कोटी रुपये खर्च करण्यात आले असून हिंदू-मुस्लिम-दलित असा कोणताही भेदभाव न करता सर्वांना समान न्याय देण्यात आला आहे.

बेलकुंड एमआयडीसी व नवीन बसस्थानकाबाबत विरोधकांकडून पसरवल्या जाणाऱ्या अफवा पूर्णपणे खोट्या असून विकासावर बोलण्यासारखे काही नसल्याने विरोधक अशी दिशाभूल करीत असल्याचा आरोप पवारांनी केला. औशातील मतदारांनी यापूर्वी केलेल्या विकासाची दखल घेत महायुतीला कौल देऊन विकासाच्या पर्वात सहभागी होतील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. सभेला प्रभाग दहा व अकरातील उमेदवार आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.



## श्री गुरू तेग बहादूर शहीदी शताब्दी रथाचे स्वागत

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, १४ जानेवारी :** संपूर्ण मानव समाज साठी धार्मिक स्वातंत्र्य व सत्या साठी आपले जीवन अर्पित करणारे हिंद-दी-चादर श्री गुरू तेग बहादुर साहिब जी यांच्या ३५० व्या शताब्दी समागम रथ यात्रेचे अहमदपूरमध्ये श्रद्धेने स्वागत करण्यात आले.

ही पवित्र रथयात्रा शिख, शिकलगीर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहवाल, वाल्मिकी, उदासीन व भगत नामदेव हे सर्व संप्रदाय, समाज, एकत्रितपणे हा शहीदी समागम आयोजित करीत आहेत. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे या रथयात्रेचे भक्ती भावाने पूजन अजितसिंग बावरी, युवराजसिंग टाक, सुनीकसिंग दुधाणी, सुरजीतसिंग बावरी, ज्ञानेश्वर मूलमवाड, सिध्दीसिंग बावरी, अहमदपूर भाजप तालुकाध्यक्ष प्रा. प्रताप पाटील यांचे हस्ते पूजन करण्यात आले. या प्रसंगी राजेश्वर कल्याणी, गंगाधर साखरे, किनगाव मंडळ अध्यक्ष चंद्रप्रकाश हंगे, रामनाथ पालमटे, रविशंकर स्वामी, भगवान दहिफळे, गणेश मुंढे उपस्थित होते.

## महात्मा फुले महाविद्यालयात २७ जणांनी केले रक्तदान




**त.भा. वृत्तसेवा,**

**किनगाव, १४ जानेवारी :** उच्च शिक्षण घेणाऱ्या युवकांनी स्वतःचा विकास करताना समाज व देशासाठी काम करणे हीच खरी राष्ट्रसेवा आहे हि सेवा जपताना युवकांनी कर्तव्य भावनेने रक्तदानात सहभागी झाले पाहिजे असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. बबनराव बोडके यांनी सोमवारी राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीच्या निमित्ताने किनगांव येथील महात्मा फुले महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व रेड रेबन क्लब ग्रामीण रुग्णालयाच्या वतीने आयोजीत रक्तदान शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी केले.

तत्पूर्वी जिजाऊ आणि विवेकानंद यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. या शिबिराच्या

**युवकांनी कर्तव्य भावनेने रक्तदानात सहभागी झाले पाहिजे : प्राचार्य डॉ. बबनराव बोडके**

कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ बबनराव बोडके यांनी केले. प्रमुख पाहुणे रक्तसंक्रमण अधिकारी डॉ. मथुरा मुळे, निवासी डॉ. सचिन आदमानेकर, धोडीराम गोबाडे, स्वाती लंगोटवाड, गणेश सूर्यवंशी, गणेश स्वामी, डॉ. विठ्ठल चव्हाण, अजित इंद्राळे, ज्योती हाणमंते, प्रसाद वाघामोडे शिवम बडे, मिलींद वाघमारे, कृष्णा मोहिते आदींची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना प्राचार्य डॉ. बोडके म्हणाले की, जिल्ह्यातील रक्ताचा तुटवडा लक्षात घेऊन व युवक दिनाचे औचित्य साधून महात्मा फुले महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व रेड रेबन क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात २७ जणांनी रक्तदान केले. रक्त संकलनाचे काम विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे डॉ. मथूरा मुळे, तंत्रज्ञ स्वाती लंगोटवाड, ज्योती हाणमंते सहाय्यक तंत्रज्ञ प्रसाद वाघमोडे कृष्णा मोहिते , शिवम बडे यांनी केले आणि प्राचार्य डॉ बबनराव बोडके यांना रक्तदानासाठी केलेल्या सर्वश्रेष्ठ दानाचे प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

## बौध्द समाजाच्या वतीने लक्षवेधी धरणे आंदोलन

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, १४ जानेवारी :** तालुक्यातील मौजे कुमठा बु. येथे शासनाच्या तसेच ग्रामपंचायतीच्या नावावर असलेल्या जागेवर तातडीने बौद्ध विहार/संविधान सभागृह व अभ्यासिका केंद्र उभारण्यात यावीत, तसेच या बांधकामांसाठी आवश्यक निधी तत्काळ मंजूर करण्यात यावा, या प्रमुख मागण्यांसाठी बौद्ध समाजाच्या वतीने भव्य लक्षवेधी धरणे-निदर्शने आंदोलन करण्यात आले.

या संदर्भात, संबंधित जागांवर मागील अनेक वर्षांपासून कोणतीही ठोस कार्यवाही ग्राम पंचायतीच्या वतीने न झाल्यामुळे बौद्ध समाजात तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. समाजाच्या धार्मिक, शैक्षणिक व सामाजिक गरजांचा विचार करता बौद्ध विहार, संविधान सभागृह आणि अभ्यासिका ही अत्यावश्यक असून, त्यासाठी प्रशासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी ठाम मागणी आंदोलनकर्त्यांकडून निवेदनाच्या माध्यमातून करण्यात आली.

सूरूवातीला डॉ.बाबासाहेब आंबेडकर, जिजाऊ मॉसाहेब, स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून सामूहिक अभिवादन करण्यात आले.

त्या नंतर सामूहिक त्रीशरण पंचशिल घेण्यात आले.या अंदोलनाचे नेतृत्व युवकनेते डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी यांनी केले. या प्रसंगी माजी सभापती ॲड. टी. एन. कांबळे, माधवराव तिगोटे, उत्तमराव माने, डॉ.साखरे, अण्णाराव सूर्यवंशी, भगवानराव ससाणे, व्हीएस पँथरचे गोविंदराव कांबळे, अकबर शेख, रोहन कांबळे आदींनी मनोगत व्यक्त केले.

या आंदोलनाच्या माध्यमातून शासनाचे व प्रशासनाचे लक्ष या प्रलंबित प्रश्र्नांकडे वेधण्यात येणार असून, मागण्या मान्य न झाल्यास पुढील टप्प्यात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही गटविकास अधिकारी याउअंना दिलेल्या निवेदनात देण्यात आला आहे.

याप्रसंगी दशरथ तिगोटे, नारायण तिगोटे, श्रावण तिगोटे, प्रवीण तिगोटे, पांडुरंग तिगोटे, सुरेश तिगोटे, रामराव तिगोटे, व्यकंट तिगोटे, मच्छिंद्र तिगोटे, नितीन तिगोटे, राहुल तिगोटे, वामन तिगोटे, यशोदा वाघमारे, क्रांती तिगोटे, वर्षा तिगोटे, करुणा तिगोटे, आम्रपाली तिगोटे, वंदा तिगोटे, सम्राट मित्र मंडळाचे तालुकाध्यक्ष शरद सोनकांबळे, शहराध्यक्ष बजरंग गायकवाड, ग्रामपंचायत सदस्य संतोष गायकवाड, डॉ.बालाजी थिट्टे, सचिन बानाटे, संविधान कदम, विकास ससाणे, रितेश रायभोळे आकाश वाघमारे, आकाश पवार, प्रकाश लांडगे आदींसह असंख्य बांधवांची उपस्थिती होती.

## संत मन्मथ स्वामी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत युवा दिन

**त.भा. वृत्तसेवा,**

**शिरूर अनंतपाळ, १४ जानेवारी :** शिरूर अनंतपाळ येथील संत मन्मथ स्वामी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत श्री स्वामी विवेकानंद जयंती निमित्त राष्ट्रीय युवा दिन साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून प्रा. अभय बोंडगे शिवनेरी महाविद्यालय शिरूर अनंतपाळ यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आयएमसी सदस्य गणेश खरटमोल व पंडित हातरगे उपस्थित होते.

दि. ३१ डिसेंबर २०२५ रोजी रोटरी क्लब लातूर व शासकीय महाविद्यालय लातूर यांच्या सौजन्याने संस्थेत रक्तदान शिबिर घेण्यात आले होते.

रक्तदान केलेल्या प्रशिक्षणार्थी व कर्मचाऱ्यांना वरील मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पवार यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी संस्थेतील सर्व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

उपप्राचार्य रेणापूरे, गणेश खरटमोल, पंडीत हातरगे, तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्था शिरूर अनंतपाळ येथील सर्व कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## मुलींना कायद्याचे ज्ञान आवश्यक : न्या. गाडे

**त.भा. वृत्तसेवा,**

**निलंगा, १४ जानेवारी :** विद्यार्थ्यांना शालेय जीवनात कायद्याचे ज्ञान मिळाले तर विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होवून संकटाला सामोरे जाण्याचे बळ प्राप्त होते असे प्रतिपादन निलंगा न्यायालयातील दिवाणी सहन्यायाधीश श्रीमती के. पी.गाडे यांनी केले.

जिल्हा परिषद कन्या प्रशाला निलंगा येथे तालुका विधी सेवा समिती निलंगा व विधीज्ञ मंडळ निलंगा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कायदेविषयक शिबिरात मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रभारी मुख्याध्यापिका माने अर्चना तर प्रमुख पाहुणे म्हणून , ॲड. एस व्ही. धैर्य, ॲड. डी बी. साळुंके,




ॲड. श्रीमती व्ही.बी. कांबळे , ॲड. श्रीमती व्ही. व्ही. कुलकर्णी उपस्थित होते.

पुढे बोलताना दिवाणी सह न्यायाधीश गाडे यांनी पोक्सो कायद्याविषयी विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. सुरुवातीला कन्या प्रशालेच्या वतीने मान्यवरांचा सत्कार केला. सूत्रसंचालन एम. एम.जाधव यांनी तर आभार सगरे आर.एम. यांनी मानले. कार्यक्रमासाठी गुंजीटे अरविंद, श्रीमती पाटील सुनीता, श्रीमती बोंडगे सुंदर, श्रीमती जोती जाधव, सय्यद वाय. झेड. यांनी परिश्रम घेतले.

## दुकानाला आग लागून ५० लाखांचे साहित्य खाक

**त.भा. वृत्तसेवा,**

**पानगाव, १४ जानेवारी :** पानगांव-तालूक्यातील पानगाव येथील विठाई ट्रेडर्स या दुकानाला आग लागून या आगीत ५० लाख रुपयांचे साहीत्य जळून खाक झाल्याची फिर्याद दुकान मालक शिरीष नवनाथ चव्हाण या पानगाव ता रेणापूर यांनी रेणापूर पोलीस ठाण्यात दिल्या वरुन अज्ञात व्यक्ती विरुध्द रेणापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रेणापूर तालुक्यातील पानगाव येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक ते रेल्वे गेट दरम्यान पानगाव धर्मापुरी रस्त्यावर बिल्डींग मटेरीयल चे विठाई ट्रेडर्स नावाने दुकान आहे.दररोजच्या नेहमी प्रमाणे दुकान दिनांक १३ जानेवारी रोजी ८ वाजता बंद करुन मालक घरी गेले आसता त्यांना रात्री ११.३० वाजण्याच्या सुमारास

**भिंतीला होल पाडून दुकान पेटवून दिल्याचा अंदाज**

अचानक दुकानाला आग लागल्याचा फोन आला त्याच क्षणी मालक दुकानात पोहचले आसता दुकानाला मोठ्या प्रमाणात आग लागल्याचे दिसून आले.दुकान हे पत्र्याचे शेड असल्यामुळे आगीने संपुर्ण दुकान लालबुंद आगीचे लोळ दिसत होते.सदरील आग विजवण्यासाठी रेणापूर नगरपंचायतच्या अग्नीशमन दलाच्या गाडीला संपर्क केला आसता गाडीला चालक उपल्बध नसल्याचे फोनवर समजले.या नंतर रात्री २ वाजता ही गाडी उशीरा लातूर येथील अग्निशमन गाडीला संपर्क करुन मागवण्यात आली तेंव्हा ही गाडी येईपर्यंत या दुकानातील सर्व साहीत्य जळून खाक झाले होते.

सदरील दुकानाच्या पश्र्चीम दिशेला भिंतीला दोन होल पाडून आत मध्ये पेट्रोल किंवा डिझेल टाकून दुकान अज्ञान व्यक्तीने पेटवून दिल्याचा अंदाज व्यक्त करीत रेणापूर पोलीस ठाण्यात शिरीष चव्हाण यांनी दिलेल्या फिर्यादीवरून घटनास्थळी पोलीस जमादार नामदेव सारोळे,संदीप चव्हाण, ए पि आय पाटील यांनी घटनास्थळी भेट देऊन घटनास्थळाचा पंचनामा केला असून दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात व्यक्ती विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## श्रीराम विद्यालयात माता पालकांचा सत्कार

**त.भा. वृत्तसेवा,**

**रेणापूर, १४ जानेवारी :** येथील श्रीराम प्राथमिक माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयात स्वामी विवेकानंद यांची जयंती राष्ट्रीय युवा दिन व राष्ट्रमाता जिजाऊ यांची जयंती विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली. यावेळी माता पालकांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी सर्वप्रथम रेणुका शिक्षण संस्थेचे दिवंगत उपाध्यक्ष माधवराव भातीकरे यांच्या पत्नी मुक्ताबाई भातीकरे यांच्या निधनाबद्दल भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. अध्यक्षस्थानी प्राचार्य सिद्धेश्वर मामडगे तर प्रमुख अतिथी म्हणून रेणुका अध्यापक महाविद्यालयाचे प्रा. रतन लहाने, प्रा. उमेश रणदिवे यांची उपस्थिती होती. व्यासपीठावर श्रीराम प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सतीश मोरे, अनिल कुटवाड, प्रा. भरत धायगुडे



सांस्कृतिक विभाग प्रमुख अमृतेश्वर स्वामी यांची उपस्थिती होती.

राष्ट्रमाता जिजाऊसाहेब यांच्या जयंतीचे औचित्य साधून यावेळी जयश्री गुरव, अनूसया कासलबादे, कीरण बोडके, माने या माता पालकांचा शाळेच्या वतीने पुस्तक भेट देऊन सत्कार केला. श्रावणी बोडके, कादंबरी कासलबादे, अंकीता बचाटे, श्रेया माने, रुद्र काळे, मैथिली आरदवाड, कृष्णा आरदवाड या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले.

## विश्वेश्वरय्यामध्ये गुणवंत विद्यार्थ्याचा सत्कार

**त.भा. वृत्तसेवा,**

**औसा, १४ जानेवारी :** नैतिक मुल्य आणि आई वडिलांनी घालून दिलेले संस्काराचे जतन करीत बदलत्या काळानुरुप बदलाची गरज आहे. यासाठीकाळानुरुप बदलणारे तंत्रज्ञान अवगत करावे असे आवाहन बदलत्या जगाबरोबर आपले अस्तित्व टिकविण्यासाठी लोकबिरादरी प्रकल्प, हेमलकसाचे संचालक अनिकेत आमटे यांनी केले.

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या हिवाळी परिक्षेत तालुक्यातील आलमला येथील श्री विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित विश्वेश्वरय्या इंस्टिटयुट ऑफ इंजिनीअरिंग अॅण्ड टेक्नॉलॉजी महाविद्यालयाचा निकाल १००% लागला. या परिक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार अनिकेत आमटे यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.




संस्थाध्यक्ष शिवचरण धाराशिवे, उपाध्यक्ष प्रभाकर कापसे, सचिव बसवराज धाराशिवे, सहसचिव महादेव खिचडे, गटविकास अधिकारी आनंदकुमार मिरगणे, गृहनिर्माणचे अभियंता रविशंकर भावले, माधव गंगापुरे, विश्वनाथ निलंगेकर, प्राचार्य प्रशांत धाराशिवे, प्राचार्य विश्वेश्वर धाराशिवे, प्राचार्या स्वाती कापसे उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या हिवाळी परिक्षेत या महाविद्यालयाचा अंतीम वर्षाचा निकाल १०० टक्के लागला आहे. महाविद्यालयातुन १०६ विद्यार्थी ९० टक्के पेक्षा अधिक गुण घेऊन उतीर्ण झाले आहेत. ६५७ विद्यार्थी विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत या उल्लेखनीय यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्याचा सत्कार उपस्थित मान्यवरांकडून करण्यात आला.

संस्थेचे सचिव बसवराज धाराशिवे म्हणाले, संस्थेत विद्यार्थ्याच्या सर्वांगिण विकासासाठी अनेक उपक्रम राबविण्यात येत आहेत. तसेच या उपक्रमाव्दारे विद्यार्थ्याची संशोधनवृत्ती ओळखुन त्यांच्या कला गुणांना वाव देणारे उपक्रम प्रामुख्याने संस्थेत राबवुन गुणवत्ताधारक विद्यार्थी घडविण्यात येत आहेत. यामुळे चांगल्या दर्जेदार पदावर काम काम करीत या संस्थेत शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली असल्याचे बसवराज धाराशिवे यांनी यावेळी स्पष्ट केले.

गटविकास अधिकारी आनंदकुमार मिरगने म्हणाले, संस्था चालकांनी या शिक्षणसेवाकार्यातून माळरानाचे नंदनवन करून बदलणाया जगाबरोबर चालण्याचे गुणवत्तापुर्ण शिक्षण देणारी संस्था म्हणुन नावलौकिक केले असल्याचे असे गौरवोद्गार व्यक्त करुन विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. या सत्कार सोहळयास गुणवंत विद्यार्थी व पालकांचा मोठ्या उपस्थित होते. महाविद्यालयातील सर्व विभागाचे विभागप्रमुख, प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी पुढाकार घेतला. रिया टेंकाळे, रोहन देशमुख, प्रणव जाधव, अदिती कदम यांनी सुत्रसंचालन केले. तर विभागप्रमुख प्रा. अंकुश बिडवे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## अतिवृष्टीने ऊस उत्पादकाला झटका

**त.भा. वृत्तसेवा,**

**शिरूर अनंतपाळ, १४ जानेवारी :** शिरूरअनंतपाळ तालुक्यात गेल्या खरिप हंगामात म्हणजेच ऑक्टोबर नोव्हेंबर महिन्यात झालेल्या मुसळधार पावसाने तालुक्यातील खरीप हंगामासह ऊस उत्पादक शेतकऱ्यांना पावसाचा मोठा फटका बसल्याने तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या उत्पन्नात मोठ्याप्रमाणात घट येत असल्याचे शेतकरी वर्गातून बोलले जात आहे.

तालुक्यात गेल्या ऑक्टोबर नोव्हेंबर महिन्यात मुसळधार पाऊस पडल्यामुळे शेतातील खरीप हंगामातील सोयाबीन, उडीद, मूग, तूर, ऊस पीक अक्षरशः दोन ते तीन महिने पूर्णतः पाण्यात राहिल्यामुळे खरीप हंगामातील सोयाबीनसह मूग, उडीद, तूर, ऊस, ज्वारी अशा अनेक पीकांचे मोठ्याप्रमाणात नुकसान होऊन पीक भुईसपाट झाली होती. तर त्याच दरम्यान तालुक्यातील हजारो हेक्टरवरील ऊस सततच्या पाण्याने आडवे पडुन ऊस पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले होते.

शिरूर अनंतपाळ तालुक्यात मांजरा व घरणी नदीकाठावरील शेतकऱ्यांची सुपीक जमीन असून या ठिकाणी ऊसाचे उत्पादन एकरी ७० ते ८० टन ऊस उत्पादन होण्यापेक्षा एकरी २५ ते ३० टन उत्पादन निघत असल्यामुळे येथील शेतकरी हवालदिल झाला आहे, अशी माहिती दैठणा येथील शेतकरी विजयकुमार सामणगावे यांच्याकडून प्राप्त झाली.

# ७० हजाराची लाच घेताना सरपंच पकडला

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१४ जानेवारी**

केज तालुक्यातील तरनळी येथील ४ शेतकऱ्यांच्या जलसिंचन विहिरीच्या प्रस्तावावर सही करून ते प्रस्ताव गटविकास अधिकारी, व इतर अधिकारी व कर्मचाऱ्याकडून मंजूर करून घेतो म्हणुन ७० हजार रुपयाची लाच स्वीकारताना केज तालुक्यातील तरनळी येथील सरपंच महादेव प्रताप खेडकर यांना धाराशिव येथील लाच लुचपत प्रतिबंध विभागाच्या पथकाने मंगळवारी साडेपाच वाजण्याच्या दरम्यान पकडला आहे.

केज तालुक्यातील तरनळी / काळुचीवाडी ग्रुप ग्रामपंयतचे सरपंच महादेव प्रताप खेडकर याने तक्रारदार शेतकरी व तिघाच्या जलसिंचन विहिरीचे प्रस्ताव मंजूर करण्यासाठी चौघाकडून प्रत्येकी २५ हजार रुपया प्रमाणे सरपंच महादेव खेडकर याने एकूण १ लाख रुपयाची मागणी केली होती. त्यापैकी तक्रार दाराचे १० व इतर तीन शेतकऱ्यांचे प्रत्येकी २० हजार हजार रुपये प्रमाणे असे एकूण ७० हजार रुपये मागणी करून लाच रक्कम सांगितल्यावर घेऊन येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले.७० हजाराची लाच स्वीकारताना केज तालुक्यातील तरनळी येथील सरपंच महादेव प्रताप खेडकर यास धाराशिव येथील लाच लुचपत प्रतिबंध विभागाच्या पथकाने मंगळवारी साडेपाच वाजण्याच्या दरम्यान पकडून केज पोलीस ठाण्यात लाचलुचपत कायद्यानुसार कारवाई करुन आरोपी ताब्यात घेतला आहे.




मकरसंक्रांतीनिमित्त मंदिरामध्ये सुवासिनी एकमेकींना वाण देतांना आदर्शनगर गणपती मंदिरामध्ये विठ्ठल रूक्मीणीला वाण देतांना महिला दिसत आहेत.

# पर्यावरणाचा समतोल साधला तरच भूगोल दिनाचे महत्त्व कळेल-डॉ.अशोक डोके

## (भूगोल दिन व मकर संक्रांत साजरी)

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१४ जानेवारी**

येथील स्वा. सावरकर माध्यमिक विद्यालय, बीड येथे १४ जानेवारी रोजी 'भूगोल दिन' आणि 'मकरसंक्रांत' निमित्त एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक मा. डॉ. अशोक डोके (भूगोल अभ्यासक) यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. ते म्हणाले की, भूगोल हा केवळ नकाशांचा विषय नसून तो आपल्या पर्यावरणाशी जोडलेले जीवंत शास्त्र आहे. पर्यावरणाचा समतोल साधला गेला तरच भूगोल दिनाचे महत्त्व आपल्याला कळेल. मकरसंक्रांतीच्या दिवशी सूर्याचे होणारे उत्तरायण आणि हवामानातील बदल यांचा सखोल अभ्यास विद्यार्थ्यांनी करावा. असे प्रतिपादन डोके यांनी केले.

श्री. उमेश जगताप यांनी याच दिवशी झालेल्या इतिहासातील महत्त्वाच्या पानीपतच्या लढाईची आठवण करून सांगितले की, इतिहास लक्षात ठेवला तर भूगोल टिकेल. असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि विद्यालयाचे मुख्याध्यापक मा. श्री. विठ्ठल काळे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञान न घेता सण-उत्सवांच्या मागे दडलेले वैज्ञानिक आणि भौगोलिक संदर्भ समजून घेतले पाहिजेत. आपली संस्कृती आणि विज्ञानाची सांगड घातल्यास ज्ञानाची व्याप्ती वाढते. तसेच, विविध प्रांतामध्ये मकर संक्रांतीला काय म्हणतात ते त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले.

# इरा स्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांचे बहारदार कलाविष्कार



**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१४ जानेवारी**

गेवराई शहरातील इरा पब्लिक स्कूलच्या मैदानात वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम पार पडला. आपल्या आकर्षक नृत्याने या महोत्सवात विद्यार्थ्यांनी रसिकांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनी विविध कार्यक्रम सादर करून आपले कलाविष्कार व कौशल्य सर्वा समोर सादर केले.

इरा स्कूलच्या प्रांगणात झालेल्या वार्षिक संमेलनाच्या अध्यक्षस्थानी नवनिर्वाचित नगराध्यक्षा गीता भाभी बाळराजे पवार या होत्या. तर व्यासपीठावर उपनगराध्यक्ष रेवती घुंबार्डे, शिक्षण विस्तार अधिकारी प्रवीण कळम पाटील, भाजपा महिला आघाडीच्या रत्नमाला मोटे, शिक्षक पतसंस्थेचे संचालक बापूसाहेब तारूरकर, पत्रकार संघाचे अध्यक्ष मधुकर तौर, संस्थेचे अध्यक्ष गणेश क्षीरसागर, पत्रकार तथा सरपंच भागवत जाधव, पत्रकार जुनेद बागवान, प्रसाद कुलकर्णी, प्राचार्य वर्षा क्षीरसागर, संचालक श्रीनिवास क्षीरसागर, अश्विनी कुलकर्णी यांची उपस्थिती होती.

# तरुणांनी ध्येयप्राप्तीसाठी स्वामी विवेकानंदांचा आदर्श घ्यावा-जे.बी.कुलकर्णी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१४ जानेवारी**

दीनदयाल शोध संस्थान बीड येथे कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकार द्वारा जन शिक्षण संस्थान, बीड व नानाजी देशमुख विद्यामंदिर यांच्या यांच्या संयुक्त विद्यमाने संचालक श्री गंगाधर जी देशमुख यांच्या मार्गदर्शनानुसार स्वामी विवेकानंद जयंती (राष्ट्रीय युवा दिन )आणि राजमाता जिजाऊ यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक, सेवानिवृत्त मुख्याध्यापक जे. बी. कुलकर्णी सर यांनी स्वामी विवेकानंदांच्या जीवनावर प्रकाश टाकला. ते म्हणाले, स्वामी विवेकानंद हे केवळ अध्यात्मिक गुरु नव्हते, तर ते एक महान समाजसुधारक होते. त्यांनी पाश्चात्य जगाला भारतीय वेदांत आणि योगाची ओळख करून दिली. त्यांनी स्थापन केलेले रामकृष्ण मिशन आजही मानवतेची सेवा करत आहे.

# राष्ट्राच्या सर्वांगीन प्रगतीमध्ये संविधानाची भूमिका महत्त्वाची-डॉ.रवींद्र जोगदंड

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१४ जानेवारी**

देशाच्या सर्वांगीण प्रगतीमध्ये भारतीय संविधानाची भूमिका महत्वाची आहे असे प्रतिपादन रवींद्र जोगदंड, मुख्य कार्यकारी अधिकारी स्मार्ट सिटी प्रोजेक्ट छत्रपती संभाजीनगर यांनी केले.येथील स्वा.सावरकर महाविद्यालयामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा नामविस्तार दिनानिमित्त आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे कोषाध्यक्ष सत्यनारायण लोहिया, मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा. चंद्रकांत मुळे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे,उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, उपप्राचार्य डॉ. उत्तम साळवे, डॉ सोपान सुरवसे यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना रवींद्र जोगदंड म्हणाले डॉ. बाबासाहेब बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या ज्ञान आणि संशोधनाचा उपयोग राष्ट्र उभारणीसाठी केला. न्याय, समता, बंधुत्व ही तत्वे रुजवण्याचा प्रयत्न केला. समरसतेचा विचार समाजामध्ये पेरला. महिला, कामगार वर्ग यांच्या



हक्कासाठी नियम कायदे तयार केले. रूढी, अंधश्रद्धा यांच्या पाशातून समाजाची मुक्तता केली. प्रा. चंद्रकांत मुळे म्हणाले की विद्यापीठाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव दिल्यामुळे विद्यापीठाची उंची वाढली आहे. प्राचार्य डॉ. सुहास मोराळे म्हणाले की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने चालणाऱ्या विद्यापीठाचा आज मोठा भौतिक विस्तार झाला आहे. अनेक विद्यार्थी शिक्षण घेऊन आपले करिअर घडवत आहेत. अध्यक्षीय समोरापात सत्यनारायण लोहिया म्हणाले की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी गोरगरिबांसाठी शिक्षणाची दारे खुली केली.सर्व जाती-धर्मांना मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सोपान सुरवसे यांनी केले.

# सुंदरराव सोळंके महाविद्यालयामध्ये कोटक बँकेसाठी कॅम्पस मुलाखतीचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१४ जानेवारी**

म. शि. प्र.मंडळाच्या सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील प्लेसमेंट विभागामार्फत कोटक बँकेसाठी दि १७ जानेवारी रोजी कॅम्पस मुलाखतीचे आयोजन करण्यात आले आहे.महाविद्यालयाचे करियर गाइडन्स आणि प्लेसमेंट सेल आणि पुणे येथील ग्लोबल आऊटसोर्सिंग आणि ट्रेनिंग सर्विसेस यांच्या संयुक्त विद्यमाने खाजगी क्षेत्रातील नामवंत बँकेसाठी कॅम्पस ड्राईव्ह चे आयोजन करण्यात आले आहे.दि १७ जानेवारी २०२६ रोजी शनिवारी सकाळी १० वाजता महाविद्यालयातील सेमिनार हॉलमध्ये मुलाखती चे आयोजन करण्यात आलेले आहे.

यामध्ये महाविद्यालयातून २०२२ पासून २०२६ पर्यंत कोणत्याही शाखेतून पदवी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी -विद्यार्थिनी मुलाखतीसाठी सहभागी होऊ शकतात. कॅम्पस मुलाखतीच्या अधिक माहिती करिता प्लेसमेंट सेलचे समन्वयक प्रा. डॉ. मोतेकर एस.सी . प्रा. उदावंत बि.डी. गणेश शहाणे यांच्याशी संपर्क साधावा.खाजगी बँकिंग क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी मुलाखतीस उपस्थित राहून संधीचा जास्तीत जास्त लाभ करून घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. के .सानप, प्रभारी प्राचार्य डॉ. एन .के. मुळे ,उपप्राचार्य डॉ.प्रा. कव्हळे एम. ए., प्रा.पी .व्ही. गवते, प्रा. पी. एस .शिंदे, प्रबंधक प्रशांत चव्हाण यांनी केले आहे.

# जयभवानी महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे उदघाटन

**तभा वृत्तसेवा**
**पाटोदा दि.१४ जानेवारी**

आत्मविश्वासाने स्पर्धा परीक्षेस सामोरे जा ! यश मिळतेच !असे प्रतिपादन बीड जिल्ह्याचे दबंग कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक मा.श्री.नवनीत कॉवत साहेब यांनी केले.ते पाटोदा येथिल जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला व विज्ञान महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या करिअर कट्टा अंतर्गत मोफत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या उदघाटन सोहळ्यात प्रमुख उदघाटक म्हणुन बोलत होते.पुढे बोलताना ते म्हणाले की ग्राणीण भागातील विद्यार्थी एकदा अपयश आले की खचुन जातात.अपयशाने खचुन न जाता जिद्द,परिश्रम, योग्य नियोजन करून आत्मविश्वासाने स्पर्धा परीक्षेस सामोरे जा! यश नक्कीच मिळते.आपल्या स्वत:च्या बालपणापासून शैक्षणिक आठवणी सांगुन परस्थितीवर मात करून इथपर्यंत ते कसे आले हे भावनिक होऊन सांगितले. युपीएससी परीक्षेची पुर्वतयारी कशी करावी.हे सांगताना अभ्यासक्रम,नियोजन,जिद्द, चिकाठीने अभ्यास कसा करावा हे सांगितले.पोलीस प्रशासनातील सेवेचे अनुभव सांगुन,भविष्यात राष्ट्रसेवा व समाजसेवेला प्राधान्य द्यावे!अशी अपेक्षा व्यक्त केली.विद्यार्थ्यांच्या आनेक प्रश्नाना त्यांनी समाधानकारक उत्तरे देवुन शंकेचे निरसन केले.या उदघाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी मार्गदर्शक प्राचार्य डॉ.विश्वास कदम हे होते.तर स्वागताध्यक्ष म्हणुन प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे हे होते.व्यासपीठावर उच्च न्यायालय



खंडपीठ छ.संभाजीनगरचे ड.तात्यासाहेब घुमरे (पवार ) यांची प्रमुख उपस्थिती होती.पोलीस अधीक्षक मा.श्री.नवनीत कॉवत साहेब यांचे आगमन होताच महाविद्यालयात स्वसंरक्षणासाठी मुलींना मोफत कराटे प्रशिक्षण दिले जाते.त्या कराटे प्रशिक्षणाचे चित्तथरारक प्रात्यक्षिक करण्यात आले.या प्रसंगी ड.तात्यासाहेब घुमरे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की ग्रामीण भागातील विद्यार्थी योग्य मार्गदर्शना आभावी स्पर्धा परीक्षेकडे जात नाहीत.तेव्हा अशा मार्गदर्शन केंद्रामुळे त्यांना फायदा होईल.म्हणुन त्यांनी महाविद्यालयाच्या या उपक्रमाचे कौतुक करून या केंद्राच्या कार्याला शुभेच्छा!दिल्या अध्यक्ष प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की.पाटोदा हा दुष्काळग्रस्त व उसतोड कामगारांचा परिसर म्हणुन ओळखला जातो.तेव्हा या परिसरातील हुशार व होतकरु विद्यार्थ्यासाठी महाविद्यालयात हे मोफत स्पर्धा परीक्षा मार्गदर्न केंद्र सुरू करत आहोत. विद्यार्थ्यांनी या मार्गदर्शन केंद्राचा योग्य उपयोग करावा व स्पर्धा परीक्षेकडे वळावे.लागेल ती मदत व मार्गदर्शन करू!अशी ग्वाही दिली.

# पुस्तकाचा गंध मस्तकात रुजला की माणूस घडतो - प्रा.डॉ. प्रल्हाद लुलेकर

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिनानिमित्त तुलसी महाविद्यालयात व्याख्यान

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१४ जानेवारी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव मराठवाडा विद्यापीठाला लाभल्यानंतर या विद्यापीठाचा दर्जा ज्ञानाने समृद्ध करणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. ज्ञानाची श्रीमंती वाढली, पुस्तकाचा गंध मस्तकात रुजला की माणूस घडतो, असे प्रतिपादन प्रसिद्ध विचारवंत व साहित्यिक प्रा.डॉ. प्रल्हाद लुलेकर यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नामविस्तार दिनानिमित्त बुधवार (दि. १४) रोजी तुलसी शैक्षणिक समूह, बीड यांच्या वतीने आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. हा कार्यक्रम तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीड येथे पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नालंदा फाउंडेशन, बीडचे अध्यक्ष मा.प्रा.प्रदीप रोडे होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रियदर्शी बहुजनवादी स्पर्धा परीक्षा केंद्राचे अध्यक्ष प्रा.अशोक गायकवाड तसेच जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे उपायुक्त मा.उमेश सोनवणे उपस्थित होते.



डॉ. लुलेकर यांनी मराठवाड्याचा ऐतिहासिक, सामाजिक व शैक्षणिक प्रवास उलगडून सांगताना नमूद केले की, मराठवाडा हा दीर्घकाळ गुलामीत राहिलेला प्रदेश असून निजामशाहीच्या काळात शिक्षणाची मोठी पीछेहाट झाली. १९५८ मध्ये मराठवाडा विद्यापीठाची स्थापना झाल्यानंतरच या भागात उच्च शिक्षणाची खरी सुरुवात झाली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विकास वाघमारे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ.योगिता लांडगे यांनी, तर आभार प्रदर्शन प्रा.किशोर वाघमारे यांनी मानले. कार्यक्रमास संस्थेच्या विविध शाळा व महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षकवृंद, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चित्रकला ग्रेड परीक्षेत नागनाथ विद्यालयाचा १०० टक्के निकाल

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१४ जानेवारी**

कला संचालनालय मुंबईच्या वतीने सप्टेंबर २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या चित्रकला ग्रेड परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून नागनाथ विद्यालयाचा निकाल १०० टक्के इतका लागला आहे या शाळेने चित्रकला परीक्षेत घवघवीत यश मिळविले आहे.

नागनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातून 'इलेमेंटरी' परीक्षेला एकूण ३४ विद्यार्थी बसले होते. ते सर्वच्या सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विशेष म्हणजे एक विद्यार्थी '-' ग्रेड श्रेणीत उत्तीर्ण झाला



आहे व ३१ विद्यार्थी 'इ' ग्रेडश्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले आहेत तर दोन विद्यार्थी 'उ' ग्रेड श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले आहेत तसेच 'इंटरमिजीएट' परीक्षेत एकूण ९ विद्यार्थी बसले होते ते सर्वच्या सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये '-' ग्रेड श्रेणीमध्ये ६ विद्यार्थी व 'इ 'ग्रेड श्रेणीमध्ये ३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या सर्व विद्यार्थ्यांचा व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचा शाळेच्या वतीने प्राचार्य डी. बी. माटे यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

# नानाजी देशमुख विद्यामंदिर येथे राष्ट्रीय युवा दिन आणि राजमाता जिजाऊ यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१४ जानेवारी**



सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि प्रतिमा पूजन करण्यात आले. व्यासपीठावर श्रीमती सुनंदा ताई कुलकर्णी, जे. बी. कुलकर्णी सर, एस. एन. कुलकर्णी सर, सीमा ताई मनुरकर, अर्चना मोराळे ताई उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांचे स्वागत हे स्वागत गीताने करण्यात आले. हे गीत चौथीच्या विद्यार्थिनींनी गायले. प्रास्ताविकात कार्यक्रमाची रुपरेषा मोराळे ताई यांनी सांगितली. सोनसाळे ताई यांनी 'जिजाई माझी सागर' हे गीत गायले.

प्रमुख मार्गदर्शक जे. बी. कुलकर्णी सर यांनी स्वामी विवेकानंद यांच्या बद्दल अतिशय सुंदर रित्या आणि उदाहरणासहीत माहिती सांगितली.त्यांनी रामकृष्ण मिशन ची स्थापन केली.ते एक महान समाजसुधारक आणि अध्यात्मक गुरू होते.ज्यांनी पाश्चात्य जगाला वेदांत आणि योगाची ओळख करून दिली , त्यांचे कार्य तरुणांसाठी प्रेरणादायी असुन *उठा* *जागे* *व्हा* *आणि* *आपले* *ध्येय* *साध्य* *होईल* *तो* *पर्यंत* *थांबू* *नका* यासारख्या विचाराने ते आजही सर्वांच्या मनात रूजले आहेत. अध्यक्षीय भाषणात सुनंदा ताई यांनी स्वामी विवेकानंद यांचे गुण आणि जिजामाता बद्दल माहिती सांगितली. अशा प्रकारे हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. कार्यक्रमातून चांगली प्रेरणा मिळावी यासाठी आम्हाला डॉ. सीमाताई जोशी , ड. अर्चना ताई तुंगार, मा. गंगाधर जी देशमुख सर , श्रीमती सुनंदा ताई कुलकर्णी वेळोवेळी मार्गदर्शन करतात. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयश्री ताई, प्रास्ताविक मोराळेताई, आभार प्रदर्शन शितल ताई यांनी मानले. यासाठी सर्व शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

CMYK

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर तरुण भारत

## प्रदेश उपाध्यक्षपदी मल्लिनाथ जळकोटे यांची फेरनियुक्ती



**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.१४ जानेवारी -**

गेल्या नऊ वर्षांपासून पत्रकार सुरक्षा समितीच्या वतीने राज्यातील पत्रकारांच्या विविध प्रश्नांसाठी आंदोलन, उपोषणे, निवेदने व शासनाशी सातत्याने पत्रव्यवहार करून प्रभावी पाठपुरावा करण्यात येत आहे. ज्येष्ठ पत्रकार समान पेन्शन योजना, आरोग्य व विमा योजना, पत्रकारांसाठी घरकुल योजना, ग्रामीण पत्रकारांना एसटी बसमधून मोफत प्रवास, चारचाकी वाहनांना टोलमधून सूट, युट्युब व पोर्टल माध्यमांना शासकीय जाहिराती, तसेच पत्रकारांवरील हल्ले, धमकी व मारहाणीच्या घटनांबाबत स्वतंत्र चौकशी अशा विविध मागण्यांसाठी समिती आक्रमक भूमिका घेत आहे.

या पार्श्वभूमीवर पत्रकार सुरक्षा समितीच्या प्रदेश उपाध्यक्षपदी मल्लिनाथ जळकोटे यांची फेरनियुक्ती करण्यात आल्याची माहिती प्रदेश अध्यक्ष यशवंत पवार यांनी दिली. लवकरच त्यांना नियुक्तीपत्र, ओळखपत्र देऊन शाल व पुष्पगुच्छ देत सत्कार करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## संक्षिप्त वृत्त...



### सहा दिवसीय उद्योजकता विकास कार्यशाळेस उत्स्फूर्त प्रतिसाद

**तुळजापूर, दि.१४ जानेवारी -**

सूक्ष्म, मध्यम व लघुउद्योग मंत्रालय, भारत सरकार यांच्या वतीने सहा दिवसीय उद्योजकता विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत उद्योग सुरू करण्याच्या प्रक्रिया, डिजिटल मार्केटिंग, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, सायबर सिक्युरिटी तसेच विविध शासकीय योजनांची माहिती देण्यात आली. कार्यशाळेस मंत्रालयाचे असिस्टंट डायरेक्टर राहुल कुमार मिश्रा, विभागीय अधिकारी सुदाम नलावडे, स्वयंभू संस्थेचे डायरेक्टर प्रकाश पाटील व जिल्हा उद्योग केंद्राचे प्रकल्प अधिकारी पांडुरंग मोरे यांनी मार्गदर्शन केले. यशवंतराव चव्हाण महाविद्यालय व श्री समर्थ कॉम्प्युटर यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्राचार्य डॉ. मुकुंद गायकवाड, उपप्राचार्य डॉ. प्रवीण भाले, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. नितीन बिराजदार यांची उपस्थिती होती.



### लिट्ल फ्लॉवर्स शाळेत जिजाऊ माँसाहेब व विवेकानंद जयंती साजरी

**तुळजापूर, दि.१४ जानेवारी -**

येथील लिट्ल फ्लॉवर्स मराठी प्राथमिक शाळेत राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ माँसाहेब तसेच स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवरायांना स्वराज्य स्थापनेसाठी घडविणाऱ्या, अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी आत्मविश्वास व स्वाभिमानाची प्रेरणा देणाऱ्या जिजाऊ माँसाहेब तसेच भारतीय युवकांसाठी आदर्श संकल्पना मांडणारे, भारतीय संस्कृतीची पताका परदेशात फडकावणारे महान विचारवंत स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. मुख्याध्यापक संजय पवार व अविनाश गव्हाणे यांच्या हस्ते प्रतिमांचे पूजन करण्यात आले. यावेळी सांस्कृतिक विभाग प्रमुख शिवाजी कारंडे यांनी जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद यांच्या जीवनकार्याची ओळख विद्यार्थ्यांना करून दिली. कार्यक्रमास शाळेतील सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.



### जिजामाता कन्या प्राथमिक शाळेत राजमाता जिजाऊ जयंती उत्साहात

**तुळजापूर, दि.१४ जानेवारी -**

येथील जिजामाता कन्या प्राथमिक शाळेत स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ यांची जयंती अत्यंत उत्साहात व भक्तीमय वातावरणात साजरी करण्यात आली. या निमित्ताने शाळेत विविध सांस्कृतिक व वैचारिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी शाळेच्या मुख्याध्यापिका माने माधुरी विश्वनाथ यांच्या हस्ते राजमाता जिजाऊंच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करण्यात आले. 'जय भवानी, जय शिवाजी' आणि 'राजमाता जिजाऊंचा विजय असो' अशा घोषणांनी शाळा परिसर दुमदुमून गेला. या कार्यक्रमास शाळेतील शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थिनी उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एका विद्यार्थिनीने केले, तर आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली. शेवटी सर्व विद्यार्थिनींना खाऊचे वाटप करण्यात आले.



### तावशीगड येथे सेंद्रिय शेती विषयक शेतकरी कार्यशाळा उत्साहात

**उमरगा, दि.१४ जानेवारी -**

वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्टच्या आयोजनातून व टाटा कम्युनिकेशनच्या अर्थसहाय्यातून दि.१२ जानेवारी रोजी तावशीगड येथे सेंद्रिय शेती विषयक शेतकरी कार्यशाळा उत्साहात पार पडली. कार्यशाळेला तालुका कृषी अधिकारी देवकाते, मंडळ कृषी अधिकारी माळकुंजे व सेंद्रिय शेती तज्ज्ञ जाधव प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यशाळेत सेंद्रिय शेतीची गरज व फायदे, बीजप्रक्रिया, जीवामृत, घनजीवामृत, वेस्ट डीकंपोझर, एकात्मिक कीड-रोग व्यवस्थापन, फळबाग लागवड, ठिबक-तुषार सिंचन, शेतीपूरक व्यवसाय तसेच कृषी विभागाच्या विविध योजनांची माहिती देण्यात आली. या कार्यक्रमास १२० महिला व पुरुष शेतकरी उपस्थित होते. सूत्रसंचालन विठ्ठल ढवळे यांनी केले तर आभार खंडू पांढरे यांनी मानले.

# बॅरेजमधील काळ्या मातीची खुलेआम विक्री; महसूल विभागाच्या दुर्लक्षावर प्रश्नचिन्ह







**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१४ जानेवारी -**

नळदुर्ग जवळील जकणीतांड्यालगत असलेल्या बॅरेज क्रमांक दोनमधून काळ्या मातीची खुलेआम विक्री सुरू असून, याकडे महसूल विभागाचे गंभीर दुर्लक्ष झाले असल्याचा आरोप होत आहे. या प्रकरणी तात्काळ चौकशी करून कारवाई करावी, अशी मागणी शेतकरी व नागरिकांकडून होत आहे.

महाराष्ट्र सरकारने 'गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार' हा उपक्रम राबविण्याचा निर्णय घेतला असून, या अंतर्गत धरणे व तलावातील गाळ व काळी माती शेतकऱ्यांना मोफत देण्याचा शासनाचा स्पष्ट धोरणात्मक निर्णय आहे. मात्र नळदुर्गजवळील बॅरेज क्रमांक दोनमध्ये या निर्णयाला हरताळ फासला जात असून, काळी माती राजरोसपणे शेतकऱ्यांना विकली जात असल्याचे चित्र दिसून येत आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून हा प्रकार सुरू असून आतापर्यंत शेकडो ब्रास काळी माती काढून तिची विक्री झाल्याचे सांगितले जाते. दररोज जेसीबी मशीनच्या सहाय्याने मोठ्या प्रमाणात माती उपसली जात असून, अनेक डंपर भरून रवाना होत आहेत.

मात्र ही माती नियमानुसार काढली जात आहे की बेकायदेशीर, याची कोणतीही नोंद किंवा तपास महसूल विभागाकडून झालेली नाही. रॉयल्टी भरली आहे की नाही, भरली असल्यास किती ब्राससाठी, याचीही पडताळणी झालेली नसल्याचा आरोप आहे.

अतिवृष्टीमुळे अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी खरडून गेल्या असून शेतीचे मोठे नुकसान झाले आहे.

अशा परिस्थितीत शासनाने दिलेल्या धोरणानुसार गाळ व काळी माती मोफत मिळणे गरजेचे असताना, पैसे असलेले शेतकरीच ती विकत घेऊ शकत आहेत. आर्थिकदृष्ट्या दुर्बल व नुकसानग्रस्त शेतकरी मात्र या लाभापासून वंचित राहत आहेत.

त्यामुळे प्रशासनाने तात्काळ बॅरेज क्रमांक दोनमधील माती उत्खनन व विक्रीची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, तसेच शासनाच्या धोरणानुसार प्रत्येक शेतकऱ्याला गाळ व काळी माती मोफत उपलब्ध करून द्यावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

## सीईआयआर पोर्टलमुळे उमरगा पोलिसांचे मोठे यश; १५ गहाळ मोबाईल मूळ मालकांना परत



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१४ जानेवारी -**

उमरगा पोलीस ठाण्याच्या हद्दीत नागरिकांकडून गहाळ झालेल्या विविध कंपन्यांच्या एकूण १५ मोबाईल फोनचा उएखठ पोर्टलच्या माध्यमातून यशस्वी शोध घेण्यात उमरगा पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. हे मोबाईल अपर पोलीस अधीक्षक, धाराशिव शफकत आमना यांच्या हस्ते मूळ मालकांना परत करण्यात आले.

उमरगा शहर तसेच परिसरातील गावांमध्ये आठवडा बाजार, प्रवासादरम्यान नागरिकांचे मोबाईल गहाळ होण्याच्या घटना घडल्या होत्या. प्राप्त तक्रारींच्या आधारे उमरगा पोलिसांनी उएखठ पोर्टलवरून मोबाईलचे लोकेशन सातत्याने ट्रॅक करत ते हस्तगत केले. दि.१३ जानेवारी २०२६ रोजी पोलीस ठाणे उमरगा येथे झालेल्या वार्षिक तपासणीवेळी हे मोबाईल नागरिकांना सुपूर्द करण्यात आले. मोबाईल परत मिळालेल्या नागरिकांमध्ये अश्विनी कांबळे, गजानन बिराजदार, श्रीधर लोहार, जगदेवी अस्तगे, महेश कदारे, हिराचंद मुळे, शुभम बोळगावे, संदीप सुगावे, लक्ष्मी राजपूत, भाग्यश्री कांबळे, मिलिंद मुजगेकर, आकाश राठोड, योगेश सूर्यवंशी, प्रदीप भोसले व प्रविण गायकवाड यांचा समावेश आहे. मोबाईल मिळाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

ही कामगिरी पोलीस अधीक्षक धाराशिव रितु खोखर, अपर पोलीस अधीक्षक शफकत आमना व उपविभागीय पोलीस अधिकारी उमरगा सदाशिव शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रल्हाद सूर्यवंशी, पोहेका. राजेश वादे व पोको. संभाजी घुले यांच्या पथकाने पार पाडली.

या कारवाईमुळे उमरगा पोलिसांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. नागरिकांनी मोबाईल गहाळ किंवा चोरीस गेल्यास तात्काळ पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवावी, असे आवाहन उमरगा पोलिसांनी केले असून नागरिकांच्या सुरक्षेसाठी पोलीस सदैव तत्पर असल्याचे सांगण्यात आले.

## माँ साहेब जिजाऊ जयंतीनिमित्त अणदूर येथे सामाजिक उपक्रम



**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.१४ जानेवारी -**

माँ साहेब जिजाऊ जयंतीनिमित्त पौर्णिमा महिला बहुद्देशीय संस्था, अणदूर यांच्या वतीने समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत पाच स्तनदामाता व पाच बालिकांना बेबी किटचे वाटप करण्यात आले.

या बेबी किटमध्ये गादी, लोड, अंगड, टोपडे, मोजे, जाळी नेट तसेच लहान मुलांसाठी आवश्यक असलेले सर्व साहित्य समाविष्ट होते. यासोबतच मातांना साडी-चोळी, हार व पुष्पगुच्छ देऊन माता व बालिकांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाबई चव्हाण होत्या, तर प्रमुख पाहुण्या म्हणून कस्तुरा कारभारी उपस्थित होत्या. कार्यक्रमास महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी राधिका मल्हारी रोकडे, विनयशाली अमोल डावरे, भक्ती विलास बोनगरगे, सगुणा सुनील गायकवाड, अल्का नागनाथ जाधव या पाच माता व त्यांच्या बालिकांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नागेश चव्हाण व विद्या चव्हाण यांनी विशेष परिश्रम घेतले.

पौर्णिमा महिला बहुद्देशीय संस्थेच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात येत आहे.

## आ. सावंतांवरील आरोप बिनबुडाचे; गंगणे यांच्यावर प्रलंबित खटल्यांची जलद सुनावणी करा : कदम

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१४ जानेवारी -**

धाराशिव जिल्ह्याचे आ.प्रा.डॉ. तानाजीराव सावंत यांनी अलीकडे शहराच्या सुरक्षिततेबाबत व्यक्त केलेली चिंता ही केवळ राजकीय व प्रशासकीय व्यवस्थेपुरती मर्यादित होती.

श्री तुळजाभवानी माता हे त्यांचे कुलदैवत असून, त्यांनी कधीही प्रसादाचा अवमान केलेला नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. मात्र, त्यांच्या वक्तव्याचा विपर्यास करत पुजारी मंडळाचे माजी अध्यक्ष किशोर गंगणे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे कारवाईची मागणी केली आहे. प्रत्यक्षात गंगणे यांच्यावरच तुळजापूर शहर व मंदिराची बदनामी केल्याप्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांनी दाखल केलेला दावा जिल्हा न्यायालयात प्रलंबित आहे.

स्वतःवरील आरोपांवरून लक्ष विचलित करण्यासाठी आमदार सावंत यांच्यावर बिनबुडाचे आरोप करणे चुकीचे असल्याचे नमूद करत, गंगणे यांच्यावर असलेले मंदिर बदनामीचे खटले जलद गतीने चालवून कठोर कारवाई करावी, अशी मागणी शिवसेनेचे जिल्हा सहसंपर्कप्रमुख अमरराजे कदम परमेश्वर यांनी जिल्हाधिकारी तथा मंदिर संस्थानचे अध्यक्ष पुजार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

## जि.प. हायस्कूलच्या चित्रकला परीक्षेत शंभर टक्के यश

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१४ जानेवारी -**

उमरगा येथील आयएसओ मानांकित जिल्हा परिषद हायस्कूलच्या शासकीय चित्रकला ग्रेड एलिमेंटरी परीक्षेत शंभर टक्के यश मिळाले आहे. मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र राज्य कलाशिक्षण मंडळाच्या वतीने नोव्हेंबर २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या शासकीय रेखाकला परीक्षेचा निकाल १० जानेवारी रोजी घोषित करण्यात आला.

एलिमेंटरी ग्रेड परीक्षेत १८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. यामध्ये ए ग्रेडमध्ये इयत्ता नववीची



स्वरा गायकवाड हिने उत्कृष्ट कामगिरी बजावली.

तसेच आदित्य पांडे, अफिया उस्ताद, अरमान बागवान, अश्विनी अबाचने, भाग्यश्री सूर्यवंशी, दिव्या जमादार, गौतम कांबळे, रंभा गायकवाड, सृष्टी कोळनुरे व वैष्णवी कोळनुरे यांनी यश मिळवले, तर ४ विद्यार्थ्यांनी क ग्रेडमध्ये उत्तीर्णता मिळवली.

इंटरमिजिएट ग्रेड चित्रकला परीक्षेत २६ विद्यार्थ्यांचा सहभाग नोंदला. यामध्ये ए ग्रेडमध्ये माहीन शाने, दिवाण, श्रेयशी शिंदे, अल्फीया बानु मस्तान यांनी यश संपादन केले.

तर अनोखी एरंडे, किरण सोनकांबळे, नेत्रा शेटगार, सायली पवार, श्रावणी घोडके, स्नेहल कांबळे व सुजाता दंडगुले यांनी बी ग्रेडमध्ये उत्तीर्णता मिळवली.

या यशस्वी विद्यार्थ्यांना चित्रकला विभाग प्रमुख नागसेन बनसोडे, धनराज तेलंग व धनराज गाडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण लाभले, तर सोनाली मुसळे, फजल शेख व पुजा गुंडीले यांनीही विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन केले.

शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा शकुंतला मोरे, सुजाता मोरे, अमर वरवटे, अशोक पतगे, सदानंद शिवदे पाटील व मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.

## जिजाऊ व विवेकानंदांचे कार्य महिला व युवकांसाठी आजही प्रेरणादायी : वायकुळे

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१४ जानेवारी -**

महाराष्ट्राच्या मातीत स्वराज्यनिर्मितीचे स्वप्न पेरणाऱ्या राष्ट्रमाता, राजमाता जिजाऊ आणि समाजसेवेचे प्रेरक स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त प्रा. शामराव रघुनाथराव चव्हाण स्मृती वाचनालय, मुळज (शाखा उमरगा) व ॲड. शीतल चव्हाण फाउंडेशन, उमरगा यांच्या संयुक्त विद्यमाने १२ जानेवारी २०२६ रोजी उमरगा शाखेत प्रेरणादायी मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या दुय्यम निरीक्षक पुष्पावती उद्धव वायकुळे होत्या. त्यांनी राष्ट्रमाता जिजाऊंनी छत्रपती



शिवाजी महाराजांवर घडविलेले संस्कार, स्वराज्य उभारणीत मार्गदर्शन, युद्धनीती, न्यायनिवाड्यांचे महत्त्व तसेच स्वामी विवेकानंदांचे समाजवादी विचार, समानता आणि युवकांमध्ये ध्येयनिष्ठा रुजविण्याचे कार्य यावर सविस्तर मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय भाषणात चांगुणा व्हनाळे यांनी महिलांना जिजाऊंकडून प्रेरणा घेऊन धाडसी व उद्यमशील बनण्याचे आवाहन केले.

तर सविता पवार यांनी युवकांना स्वामी विवेकानंदांचा आदर्श स्वीकारून ध्येयवादी जीवन जगण्याचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमात प्रा. युसूफ मुल्ला, सत्यनारायण जाधव, राजू भालेराव, ॲड. ख्वाजा शेख, प्रदीप मोरे, किशोर बसगुंडे, देवराज पवार यांसह वाचक, नागरिक, महिला व सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रास्ताविक फाउंडेशनचे अध्यक्ष सत्यनारायण जाधव यांनी केले, तर सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन ॲड. ख्वाजा शेख यांनी केले.

आयोजकांनी सांगितले की, जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या विचारांचे जागरण व्हावे आणि नव्या पिढीला समाजपरिवर्तनाची प्रेरणा मिळावी, यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

## शबरी आवास योजनेंतर्गत पारधी समाजाच्या घरकुलांना गती

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ जानेवारी -**

शबरी आवास योजनेंतर्गत आदिवासी पारधी समाजाच्या घरकुलांसाठी आवश्यक कागदपत्रे तात्काळ उपलब्ध करून देण्यात येतील, अशी ग्वाही जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी दिली. दि.१३ जानेवारी रोजी त्यांच्या अध्यक्षतेखाली धाराशिव शहरातील पापनास नगर येथील पारधी वस्तीत मूलभूत सोयीसुविधा व सर्वांगीण विकासाबाबत महत्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीत शहरी शबरी घरकुल योजनेंतर्गत माहिती देण्यात आली. शहरातील पारधी वस्तीत ४४ लाभार्थ्यांपैकी ४३ घरकुले पूर्ण झाली असून एक घरकुल प्रगतीपथावर आहे. तसेच सन २०२४-२५ मध्ये मंजूर झालेल्या ३४५ घरकुलांपैकी २४४ पूर्ण झाली असून १०१ घरकुले सुरू आहेत.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# काँग्रेस उमेदवाराच्या पतीवर हल्ला करणारे अटकेत

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १४ जानेवारी-**

काल मंगळवारी रात्री प्रभाग क्र.१ मधील महिला उमेदवार यांचे पती शिवाजी भालेराव यांच्यावर हल्ला करुन त्यांची बॅग पळवून नेण्याचा प्रकार घडला होता. यातील चार आरोपींना स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाने आणि भाग्यनगर पोलिसांच्या पथकाने अटक करुन त्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

मंगळवारी रात्री प्रभाग क्र.१ मध्ये शिवाजी भालेराव यांच्यावर त्यांच्या घरासमोर तोंडास रुमाल बांधून पाच ते सहा जण तेथे आले आणि त्यांनी भालेराव यांना धमकी देवून त्यांच्यावर तलवारीचे वार करण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांनी खुर्ची समोर धरुन हा वार परतवून लावला होता. त्यानंतर भाग्यनगर पोलीस त्याठिकाणी



आले आणि त्यांनी घटनेची तपासणी केली.यासोबतच स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, पोलीस उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे, पोलीस निरीक्षक संतोष तांबे, पोलीस उपनिरीक्षक महेश कोरे यांनी तपासाची चक्रे फिरवली. उपलब्ध असलेले सीसीटीव्ही फुटेज व अन्य माहितीच्या आधारे पोलिसांनी रितेश पंडीत रा.सिध्दार्थ नगर, शुभंम नरवाडे रा.अरुणोदयनगर, संघर्ष वगर रा.राहुल कॉलनी, चांदेश उर्फ ओंकार जाधव रा.क्रांती चौक, वैभव गोपाळा थोरात व अन्य तीन आरोपी या प्रकरणात असल्याची माहिती मिळाली. त्यांचा शोध घेवून आज दुपारी त्यापैकी चौघांना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणात दोन विधीसंघर्ष बालक असल्याची माहिती पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांनी दिली. या सर्वांना अटक करुन त्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्यात वापरलेली एक मोटारसायकल देखील पोलिसांनी जप्त केली आहे.

दरम्यान हा हल्ला राजकिय नसुन उमदवार प्रतिनधी पैसे वाटत आहे असे समजुन बॅग चोरी करण्याच्या उद्देशाने हा हल्ला केला असल्याची कबुली आरोपींनी दिली असल्याचे पोलीसांनी स्पष्ट केले आहे.

# वासुदेव समाजाच्या स्मशानभूमीवर अतिक्रमण

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. १४ जानेवारी-**

मुदखेड तालुक्यातील डोंगरगाव येथे वासुदेव समाजाच्या स्मशानभूमीमध्ये आजूबाजूच्या लोकांकडून अतिक्रमण करण्यात आलेले असून ते तात्काळ हटवून ग्रामपंचाती दप्तरी वासुदेव स्मशानभूमी म्हणून जागेची नोंद घेण्यात यावी अशी मागणी वासुदेव समाजाच्या वतीने तहसील प्रशासनाला दिलेल्या एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

तालुक्यात डोंगरगाव येथे वासुदेव समाजाचे जवळपास दहा कुटुंब शेकडो वर्षापासून स्थायीक असून पारंपारिक अशी वासुदेव स्मशानभूमीची जागा उपलब्ध आहे,सदरील जागेवर आजूबाजूच्या नागरिकांकडून अतिक्रमण करून घरे बांधकाम करण्यात येत आहेत.यामुळे प्रशासनाने सदरील



जागेवरील अतिक्रमण तात्काळ हटवून जागेला संरक्षण द्यावे.अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर समस्त वासुदेव समाज बांधवांकडून उपोषण करण्यात येईल असा इशारा मुदखेड तहसील प्रशासनाकडे दिलेल्या एका निवेदनातून देण्यात आला आहे.सदरील स्मशानभूमीची जागा शेकडो वर्षापासून वासुदेव समाजाकडे असल्यामुळे सदरील जागा दिवसेंदिवस अतिक्रमणाच्या कचाट्यात अडकली असून या जागेची ग्रामपंचायत दप्तरी नमुना आठ अ नोंद घेण्यात यावी अशी मागणी वासुदेव समाज बांधवांकडून प्रशासनाकडे करण्यात आली आहे.

मुदखेड तहसील कार्यालयात दिलेल्या या लेखी निवेदनावर वासुदेव समाजाचे जेष्ठ कार्यकर्ते रामजी नारायण अटक, शंकर बापूराव अटक,शारदाबाई ससाने,पत्रकार रूखमाजी शिंदे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## सर्व रोग निदान शिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा : आ. कोहळीकर

**हदगाव** -हदगाव - हिमायतनगर विधानसभा क्षेत्रातील मनाठा येथे आदर्श विद्यालयात दि.१८ जानेवारी रोजी दत्ता मेघे उच्च शिक्षण



व संशोधन संस्था संचालित आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय सावंगी यांच्या संयुक्त विद्यमानाने होणाऱ्या मोफत सर्व रोग निदान व उपचार शिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा असे आव्हान आमदार बाबूराव कदम कोहळीकर यांनी केले आहे. अलीकडच्या काही वर्षापासून आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांच्याकडून विधानसभा क्षेत्रातील प्रमुख शहरात शिबिर आयोजित करण्यात येत असते. तज्ञ डॉक्टरांकडून रुग्णांची तपासणी करण्यात येत असते ज्या रुग्णांना उपचारासाठी पुढील नेण्याची वेळ आली त्या रुग्णांना जाण्याची सुविधा आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांच्याकडून केली जात आहे. आमदार बाबुराव कदम कोहळीकर आयोजित करण्यात येत असलेल्या या उपक्रमांचे रुग्णांकडून कौतुक केले जात आहे आणि गोरगरीब रुग्णांना अशाच शिबिरात सहभागी झाल्याने लाभ होत असल्याचे अनेक नागरिकांकडून आपल्या भावना व्यक्त होत आहे.

## महर्षि मार्कण्डेय जन्मोत्सव निमित्त दत्तनगरमध्ये हरिनाम सप्ताहाला सुरूवात

**नांदेड** -महर्षि मार्कण्डेय जन्मोत्सवानिमित्त दत्तनगर येथील श्री गणेश, श्री हनुमान व महर्षि मार्कण्डेय मंदिर येथे बुधवारपासून (दि.१४)



अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याला सुरूवात झाली आहे. २१ जानेवारीपर्यंत हा सोहळा चालणार असून या कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ४.३० ते ६ काकडा भजन, ६.३० ते १० ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, ११ ते दुपारी १२ गाथा भजन, दुपारी १२ ते २ महिला भजन, २ ते ४ संतकथा अमृत, सायंकाळी ४ ते ५ हरिपाठ, रात्री ७ ते ११ हरिकीर्तन व जागर होणार आहे. ज्ञानेश्वारी पारायणाचे प्रमुख बंडू महाराज, हरसदकर हे असून माधव महाराज सुंकेवार (येलूरकर) हे कथेचे निरूपन करणार आहेत. १४ रोजी माधव महाराज सुंकेवार, येलूकर यांचे किर्तन झाले. १५ रोजी दिपक महाराज, बादाडे, बीड, १६ रोजी भागवताचार्य अंजलीताई केंद्रे, लातूरकर, १७ रोजी विलास महाराज गेजगे, बोथीकर, १८ रोजी ज्योतीताई धनाडे, जालना, १९ रोजी परमेश्वर महाराज गोंटेलवार, शहापूरकर, २० रोजी मधुकर महाराज सायाळकर, परभणी, २१ रोजी कृष्णा महाराज शास्त्री, कोंडिबा महाराज संस्थान धानोरा तीर्थ, अहमदपुर यांचे हरिकीर्तन होणार आहे. २१ रोजी महर्षि मार्कण्डेय जन्मोत्सव शोभायात्रा मिरवणूक सकाळी ११ ते २ पर्यंत काढण्यात येणार आहे. त्यानंतर महाप्रसाद होणार आहे. भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन पद्मशाली समाज दत्तनगरच्या वतीने करण्यात आले आहे.

## सिडको कार्यालय येथे स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांना अभिवादन

**नवीन नांदेड** -स्वामी विवेकानंद जयंती तसेच राष्ट्रमाता, राजमाता माँ जिजाऊ जयंती निमित्त सिडको कार्यालय नांदेड येथे प्रशासक भुजंगराव गायकवाड यांच्या हस्ते स्वामी विवेकानंद व मा जिजाऊ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. नांदेड सिडको येथील सिडको कार्यालय दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी स्वामी विवेकानंद व राष्ट्रमाता राजमाता मा जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून सिडको कार्यालयाचे प्रशासक भुजंगराव गायकवाड यांनी प्रशासक पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी सिडको कार्यालय येथे आले असता. स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले यावेळी कार्यालयाचे प्रशासक भुजंगराव गायकवाड, लेखा सहाय्यक संकेत गिरी व कार्यालयाचे सुरक्षारक्षक सुनील कांबळे,लता पोहरे आदींची उपस्थिती होती.

## महानगरपालिका क्षेत्रातील मतदान केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

**नांदेड** -जिल्ह्यात नांदेड-वाघाळा महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२५-२६ च्या अनुषंगाने गुरूवार १५ जानेवारी २०२६ रोजी रोजी मतदानाच्या दिवशी मतदान सुरु झाल्यापासून ते मतदान संपेपर्यंत सर्व मतदान केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू केला आहे. याबाबतचा आदेश जिल्हादंडाधिकारी राहुल कर्डिले यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये दिनांक ९ जानेवारी २०२६ रोजी निर्गमीत केला आहे. या आदेशाद्वारे जिल्हादंडाधिकारी राहुल कर्डिले यांनी निवडणूक कालावधीत नांदेड जिल्ह्यातील नांदेड-वाघाळा महानगरपालिका निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टिकोनातून कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहण्यासाठी ज्या ठिकाणी मतदान होणार आहे त्या ठिकाणापासून २०० मीटर परिसरातील सर्व पक्षकारांचे मंडपे, सर्व दुकाने, मोबाईल, कॉडलेस फोन, पेजर, वायरलेस सेट, ध्वनीक्षेपके, सर्व प्रकारचे फेरीवाले व इतर इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे, निवडणुकीच्या कामाव्यतीरिक्त खाजगी वाहन, संबंधीत पक्षाचे चिन्हांचे प्रदर्शन व निवडणूकीच्या कामाव्यतिरिक्त व्यक्तीला प्रवेश करण्याकरिता गुरूवार १५ जानेवारी २०२६ रोजी प्रतिबंधीत केले आहे.

# किनवट नगर परिषदेच्या उपाध्यक्ष पदी हसनखान पठाण



**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १४ जानेवारी-**

नगर परिषद किनवटच्या उपाध्यक्ष व नामनिर्देशित सदस्यांच्या निवडीसाठी आज पार पडलेल्या नव्या कार्यकारिणीच्या पहिल्या सर्वसाधारण सभेत उपाध्यक्षपदी हसन खान पठान यांची निवड करण्यात आली. ही निवड ११ विरुद्ध १२ मतांनी झाली.

सदर सभेच्या पीठासीन अधिकारी नगराध्यक्षा सौ. सुजाता येंड्रलवार होत्या, तर मुख्याधिकारी मुंगाजी काकडे यांनी सचिव म्हणून काम पाहिले. उपाध्यक्ष पदासाठी महाविकास आघाडीकडून हसन खान पठान, तर महायुतीकडून माजी उपनगराध्यक्ष श्रीनिवास नेम्मानिवार यांनी उमेदवारी दाखल केली होती. मतदानात दोन्ही उमेदवारांना ११-११ मते मिळाल्याने नगराध्यक्षा यांना असलेल्या विशेष अधिकारानुसार कास्टिंग वोट देण्यात आला. हा मत हसन खान पठान यांच्या बाजूने गेल्याने त्यांची विजयी घोषणा करण्यात आली.

दरम्यान, स्वीकृत (नामनिर्देशित) सदस्य पदासाठी दोन नामांकनपत्रे दाखल झाली होती. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाकडून प्रशांत कोरडे, तर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) कडून माजी नगराध्यक्ष साजिद खान यांचे नामांकन होते. प्रशांत कोरडे यांच्या नामांकनात तांत्रिक अडचण आल्याने त्यांची निवड घोषित होऊ शकली नाही, तर साजिद खान यांची स्वीकृत सदस्य म्हणून निवड जाहीर करण्यात आली.

या निवडीनंतर महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी नगर परिषद कार्यालयासमोर फटाके वाजवून जल्लोष केला. या संपूर्ण प्रक्रियेत अपक्ष नगरसेवक चंद्रशेखर रंगराव नेम्मानिवार व सौ. ललिता मारोती मुनेश्वर यांची भूमिका निर्णायक ठरली.

यावेळी बेबीताई नाईक, जिल्हाप्रमुख ज्योतिबा खराटे, माजी उपाध्यक्ष समाधान जाधव, माहूर नगराध्यक्ष फिरोज दोसाणी, ड. राहुल नाईक, उपसभापती राहुल नाईक, बंडु नाईक, धनलाल पवार यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, पत्रकार व नागरिक उपस्थित होते.

# राष्ट्रवादीच्या कंधार येथील जनसंपर्क कार्यालयांमध्ये माॅ जिजाऊ जयंती साजरी

**तभा वृतसेवा**
**कंधार, दि. १४ जानेवारी-**

कंधार तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने नांदेड जिल्ह्याचे लोकनेते माजी खासदार तथा कंधार लोहा मतदारसंघाचे लोकप्रिय आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या कंधार येथील जनसंपर्क कार्यालयामध्ये राष्ट्र माता राजमाता जिजाऊ माँ साहेब यांची जयंती कंधार तालुका राष्ट्रवादी काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष मनोहर पाटील भोसीकर यांच्या हस्ते माँ जिजाऊ यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालुन विनम्र अभिवादन



करण्यात आले.

व मोठ्या उत्साहात माॅ जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंती महोत्सव साजरा करण्यात आला.याप्रसंगी संभाजी ब्रिगेड चे माजी जिल्हा सचिव तथा पत्रकार विनोद पाटील तोरणे उत्तमराव पाटील जाधव मधुकर पाटील डांगे चेतन भाऊ केंद्रे अविनाश गीते सतीश कांबळे उपस्थित होते.

याप्रसंगी अध्यक्षीय भाषण करताना मनोहर पाटील भोसीकर यांनी जिजाऊ एक विचार आहे.सर्व जाती धर्माच्या भिंती तोडून माणता धर्म शिकवणारी देशाला लाभलेली राजमाता आहे. प्रत्येक घरात जिजाऊ घ्या, विचारांची पेरणी झाली पाहिजे तरच समाजात अनेक शिवाजी निर्माण होतील.व सध्या समाजाला लागलेली जाती,धर्माची वाळवी नष्ट होईल असे सांगीतले. याप्रसंगी अनेक मान्यवर उपस्थित होते.

# मेंडका येथे यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. १४ जानेवारी-**

शासकीय आश्रम शाळा दुधडच्या विद्यार्थ्यांचे राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत सुवर्णयश अमरावती येथे पार पडलेल्या स्पर्धेत अनेक सुवर्ण, रौप्य व कांस्य पदकांची कमाई शासकीय व अनुदानित आश्रमशाळा राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा २०२५२६ अंतर्गत दिनांक ०५ ते ०७ जानेवारी २०२६ दरम्यान हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती येथे आयोजित स्पर्धेत शासकीय आश्रम शाळा दुधड (ता. किनवट) येथील विद्यार्थ्यांनी अत्यंत नेत्रदीपक व ऐतिहासिक यश संपादन करून शाळेचा व परिसराचा नावलौकिक राज्यपातळीवर उंचावला आहे.

या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी वैयक्तिक तसेच सांघिक क्रीडा प्रकारांमध्ये उत्कृष्ट कौशल्याचे दर्शन घडवत अनेक सुवर्ण, रौप्य व कांस्य पदकांवर आपले नाव कोरले. सुवर्ण कामगिरी करणाऱ्या खेळाडू कु. मुक्ताई परमेश्वर इंजेपवाड (मेंडका ता. मुदखेड) हिने १७ वर्षांखालील वयोगटात १०० मीटर धावणे सुवर्णपदक २०० मीटर धावणे सुवर्णपदक कु. श्रेया संजय सुदेवाड (मेंडका ता. मुदखेड) हिने तीन सुवर्ण व एक रौप्य पदक पटकावून उत्कृष्ट क्रीडा प्रदर्शन करत विशेष कौतुक मिळवले.

सांघिक क्रीडा प्रकारातील यश कबड्डी (१७ वर्षांखालील) कु. श्रेया संजय सुदेवाड व कु. मुक्ताई परमेश्वर इंजेपवाड यांना सुवर्णपदक इतर क्रीडा प्रकारातील पदकांची कमाई लांब उडी रौप्यपदक ४÷१०० मीटर रिले रौप्यपदक गोळा फेक कांस्यपदक तसेच १९ वर्षांखालील गटातही सुवर्णपदक मिळवून विद्यार्थ्यांनी आपल्या मेहनतीचे फळ मिळवले.

**यशस्वी खेळाडूंची नावे**

श्रेया संजय सुदेवाड, मुक्ताई परमेश्वर इंजेपवाड, श्रीराम संजय सुदेवाड, श्रीओम परमेश्वर इंजेपवाड, कविता माधव माझळकर, लक्ष्मी माधव माझळकर, पल्लवी दत्ता वानोळे, सुजाता नामदेव माझळकर, पल्लवी शिवाजी गुव्हाडे, पुण्यरथा सोनबा कुमरे, वैष्णवी जगदीश पेंदोरे, आशाबाई पुंडलिक अंभोरे, सुजाता रजनीकांत चव्हाण, गायत्री रजनीकांत चव्हाण, विशाल शाहुजी घोटेकर आदी विद्यार्थ्यांनी या यशात मोलाचा वाटा उचलला.

**मार्गदर्शकांचे मोलाचे योगदान**

या उज्वल यशामागे कोच परमेश्वर धोंडीबा इंजेपवाड, क्रीडा शिक्षक राहुल आपसनवाड, सचिन शिंदे, सहाय्यक प्रकल्प अधिकारी राजेंद्र शैळके, मुख्याध्यापक प्रल्हाद चामे,सतीश दासरे सर व डॉ. अशोक झुंजारे सर यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन लाभले.



नांदेड- महापालिका निवडणूकिसाठी उद्या गुरुवारी मतदान होत आहे. या अनुशंगाने कर्मचारी जोरदार तयारीला लागले आहेत.

# ग्रामपंचायत येवली येथे उपमुख्य कार्यकारी अधिकारी गिरी यांची भेट

**तभा वृतसेवा**
**तामसा, दि. १४ जानेवारी-**

येवली येथे उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायतराज विभाग गिरी साहेब यांची ग्रामपंचायत जिल्हा परिषद शाळा यांना अचानक भेट देण्यात आली येवली येथील मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत कामाची पाहणी करण्याकरता आज येवली तालुका हदगाव येथे भेट दिली असता येवली चे नागरिक ,अंगणवाडी शिक्षिका, शाळेतील शिक्षक ,शिक्षिका तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक व ग्रामपंचायतचे सरपंच व सर्व सदस्य कर्मचारी उपस्थित होते , उपमुख्य कार्यकारी साहेबांनी मनोगत व्यक्त करताना त्यांनी जिल्ह्यातून प्रथम येण्यासाठी ग्रामपंचायतला कोणती कामे करायची आणि ती कशाप्रकारे करायची ही कामे करण्यासाठी लोकसभागातून तसेच ग्रामपंचायतच्या कर वसुलीतून गावाचा विकास कसा करता येईल यासाठी मार्गदर्शन केले तसेच ग्रामसेवक यांना सर्व नमुने अद्यवंत करा असे सांगितले गावातील कामे बघून त्यांनी समाधान व्यक्त केले आज त्यांनी शाळेत जाऊन स्वतः मुलाचे व शिक्षकांशी चर्चा केली शाळेची पाहणी केली शाळा अतिशय सुंदर आहे त्यामुळे मला समाधान आनंद वाटला असे त्यांनी भाषणामध्ये सांगितले तसे गावातील वेगवेगळ्या योजनेतून कामे केल्यामुळे गाव जिल्हा पातळीवर ओळख निर्माण करत आहे अशीच कामाची प्रगती होत राहो अशी सदिच्छा त्यांनी दिल्या या कार्यक्रमाला पंचायत समिती हदगाव विस्तार अधिकारी मुंडकर साहेब गावातील प्रतिष्ठित नागरिक सरपंच शितल गजानन कंटाळे, ग्रामसेवक चिरमाडे, रामेश्वर येलकधरे, गंगाधर लासिनकर तंटामुक्ती अध्यक्ष, उपसरपंच भिवसन सोनटक्के, गजानन कंठाळे, लक्ष्मण डवरे , पप्पू यलकधरे ,शाळेतील शिक्षक माने सर, गबाळे सर, रेडी सर, मगनाळे मॅडम, कोर मॅडम, सुरेखा कंठाळे, ज्योतीताई मुगल, संगीता ताई पाटे, करुणा पंडित, किराणे ताई, व गावातील इतर नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते


# लोंबकाळणाऱ्या विजेच्या तारा व उघड्या डीपीमुळे अपघाताची दाट शक्यता !

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. १४ जानेवारी-**

येथील विद्यानगर परिसरातील वीज वितरण कंपनीच्या पोल ०००००००५ जवळील विजेच्या तारां इतक्या झोळलेल्या आहेत की, मानवी हाताच्या आवाक्यात आल्याने गंभीर धोका होण्याची दाट शक्यता आहे. तसेच शहरातील विविध डिपी उघड्यावर असल्याने देगलूर येथील महावितरण विभागाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला आहे.

देगलूर शहरातील विद्यानगर परिसरात वीज वितरण कंपनीच्या पोल क्रमांक ०००००००५ (ग्राहक क्रमांक ५५८०१०६०७३५४) याठिकाणी विजेच्या तारा मोठ्या प्रमाणात झोळ झाल्याचे निदर्शनास आले असून, त्यामुळे परिसरातील नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या तारा मानवी हाताच्या आवाक्यात येईल इतक्या खाली आल्याने कोणत्याही क्षणी गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

स्थानिक पाहणीनुसार, दोन पोलमधील अंतर अपेक्षेपेक्षा जास्त असल्यामुळे तारांवर अतिरिक्त ताण निर्माण झाला असून त्यामुळे त्या खाली झुकल्या आहेत. ही परिस्थिती विशेषतः धोकादायक असून, लहान मुले खेळताना, नागरिक ये-जा करताना किंवा एखाद्या व्यक्तीने अनावधानाने हात वर केल्यास थेट विद्युत तारांशी संपर्क होऊ शकतो. अशा प्रकारचा संपर्क जीवघेणा ठरण्याची दाट शक्यता आहे, हे लक्षात घेता



ही समस्या अत्यंत गंभीर स्वरूपाची आहे.

विद्यानगर परिसरात शाळकरी मुले, ज्येष्ठ नागरिक तसेच वर्दळीचे रस्ते असल्यामुळे अपघाताची शक्यता अधिक वाढली आहे. अशा ठिकाणी विजेच्या तारांची किमान सुरक्षित उंची राखणे हे वीज वितरण कंपनीचे कर्तव्य असून, त्या दृष्टीने सद्यस्थिती नियमबाह्य व धोकादायक असल्याचे जाणकारांचे मत आहे. या पार्श्वभूमीवर विद्यानगर येथील रहिवासी संतोष अनिलराव कोल्हे यांनी महावितरणच्या सहायक अभियंत्यांकडे लेखी निवेदन सादर केले आहे. निवेदनात दोन पोलमध्ये नवीन पोल उभा करून अंतर कमी करावे तसेच तारांची उंची वाढवून नागरिकांना सुरक्षितता प्रदान करावी, अशी स्पष्ट मागणी करण्यात आली आहे.

शहरातील विविध भागात अनेक डिपी उघड्यावर असल्याने चित्र दिसून येत आहे. त्यामुळे या डिपीच्या संपर्कात जाणाऱ्यास जीवीतहानीचा धोका नाकारता येत नाही. महावितरण विभागाचा भोंगळ कारभार सध्या चव्हाट्यावर आला असून शहरातील नागरीक अक्षरक्षः त्रस्त झाले आहेत. दरम्यान, महावितरण प्रशासनाने वेळेत उपाययोजना न केल्यास भविष्यात दुर्घटना घडण्याची शक्यता असून, त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित विभागावर राहील, असा इशारा नागरिकांकडून देण्यात येत आहे. प्रशासनाने या समस्येकडे केवळ तक्रार म्हणून न पाहता सार्वजनिक सुरक्षेचा गंभीर विषय म्हणून तातडीने दखल घेणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.